म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
बा. क्र. ७२

॥श्री॥

ठाणें, मराठी ग्रंथसंग्रहालय कचेरी.
ज्येष्ठ व. ३० शके १८४७.

"ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय" संस्थेचा

नं १२६ सन १९५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

पु. नाव — आमचे ओजस्वी वाङ्मय

ले. —

विष — निबंध

922

आमचे ओजस्वी
वाङ्मय.
निबंध

अभ्यंकर.
मुख.
टणीस.
७६

हें भाषण
त्र्यंबक हरि आवटे यांनीं आपल्या "इंदिरा छाप-
खान्यांत," पुणें पेठ सदाशिव २७० येथें छापिलें.
तें
सिताराम महादेव अभ्यंकर बी. ए. एल्. एल्. बी.
चिटणीस मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें, यांनीं पुणें पेठ सदाशिव ९८२
येथें प्रसिद्ध केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे
अनु
922
नि. ५२

श्री.

# आमचें ओजस्वी वाङ्मय
## व
# त्यांतील दिव्य नवनीत.

आमच्या **श्रुतिस्मृत्यादि** वाङ्मयांत आणि **प्राकृत** ग्रंथसंपत्तींत देखील, उच्चश्रेणींतले असंख्य विचार आपल्या दृग्गोचर होतात. सबब, त्यांपैकीं काहीं मी आपल्या समोर आज मांडतो.

## आमचें अंगण व त्याचें नैसर्गिक ऐश्वर्य.

आपल्यांत अशी एक म्हण आहे कीं, अंगणावरून घराच्या स्वरूपाची कल्पना करतां येते, आणि घर पाहून त्यांत राहाणाऱ्या माणसांची परीक्षा होते. सबब, आम्हां भारतीय **आर्यांचें** अंगण कशा प्रकारचें आहे, हें आपल्या ध्यानांत येण्यासाठीं, त्याचें एकंदर नैसर्गिक ऐश्वर्य, त्यांतील घराचें निःसीम वैभव, व त्यांत राहणाऱ्या ऋषिवर्यांचा मतिप्रकर्ष, हीं आपणांस विदित करण्याचें साहस मी केवळ उत्साहपूर्वकच करीत आहें.

आमचें **भारतवर्ष** स्थूल मानानें त्रिकोणाकृती असून, त्याच्या उत्तरेस जणुंकाय प्राकाररूपीच हिमालय पर्वताची अत्युच्च, लांबलचक, व अर्धचंद्राकार अद्रिपरंपरा इतस्ततः पसरलेली दृग्गोचर होते; आणि राहिलेल्या तीन बाजूंनीं ह्या देशाचें संपूर्ण व योग्य संरक्षण व्हावें एतदर्थ, विधात्यानें त्याला महासागरपरिवेष्टित केल्याचें निदर्शनास येतें. यासंबंधाचें **कालिदास** कविकृत वर्णन श्रे... असून, तें अर्थानें पूर्ण भरलेलें आहे. सबब, तें मी...

**अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः।**
**पूर्वाऽपरौ तोयनिधीवगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदंडः।**
**(कुमारसंभवे १-१ ).**

कदाचित्, येथें कोणी अशी शंका घेईल कीं, हा हिमाचल-प्राकार बर्फमय, कांट्यांनीं भरलेला, व भयंकर श्वापदांनींच इतस्ततः गजबजलेला असेल. मग, ह्यांत, त्याचें वर्णन करण्यासारखें ऐश्वर्य तें कोणतें ? या शंकेचें निवारण कवि कुलावतंस पुढील श्लोकांतच करून लिहितो,

**यं सर्व शैलाः परिकल्प्य वत्सं मेरौस्थिते दोग्धरि दोहदक्षे।**
**भास्वन्ति रत्नानि महौषधीश्च पृथूपदिष्टां दुदुहुर्धरित्रीम् ॥**
( कुमारसंभवे १-२ ).

ह्यावरून, त्यांत उज्ज्वलरत्नें आणि दिव्यवनस्पती, यांचा भरपूर साठा असल्याचें उघड होतें.

अशाप्रकारच्या नैसर्गिक वैभवाचें निःसीम कौतुक वाटून, ऋग्वेदांतहि तत्संबंधाचे उद्गार दृग्गोचर होतातः—"यस्येमे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रं रसया सहाहुः।यस्येमेप्रदिशो यस्य बाहू कस्मैदेवाय हविषा विधेम ॥ (ऋग्वेद. १०-१२१-४.).

शिवाय, पवित्र **सरस्वतीनदी** ( पावका नः सरस्वती । ऋ. वे. १. ३. १० ), ह्याच **भारतवर्षाला** पुनीत करते, आणि काव्य-स्फूर्ति देते ( **चोदयित्री सुनृतां** चेतन्ती सुमतीनां (ऋ.१.३.११). हीच चैतन्याचें अधिष्ठान आहे ( त्वे विश्वा सरस्वति श्रितायूंषि देव्यां । ऋ० २.४१.१७ ). **भारतवर्षांतील सप्तसिंधूमध्यें,** हीच **सरस्वती** नदी आम्हांस प्रियतम आहे ( उत नः प्रिया प्रियासु सप्तस्वसा सरस्वती—ऋ० ६.६१.१० ).कारण, **ऋक्**कवी म्हणतात, हे सरस्वति ! आम्हांला तुझें दूध वर्ज्य करूं नकोस, व तूं आम्हांला धुडकारून लावूं नकोस. त्याच प्रमाणें, देशान्तरगमनानें तुझ्या-

निबंध
८२


पासून दूर राहण्यास, आम्हांला भाग पाडूं नकोस (सरस्वति...मा पस्फरीः पयसा मा न आधक्। मा त्वत्क्षेत्राण्यरणानि गन्म ॥ (ऋ० ६-६१-१४ ). ह्याच सरस्वतीनें वध्र्यश्वाला दिवोदास नांवाचा पुत्र दिला (इयमदाद्...दिवोदासं वध्र्यश्वाय··॥ऋ०६-६१-१). ह्याच नदीचें वर्णन " पर्वतशिखरांचा चुराडा करणारी " ( इयं शुष्मेभिर्बिसखा इवारुजत्सानु गिरिणां तविषेभिरूर्मिभिः । पारावतघ्नीं सरस्वतीं...ऋ०६-६१-२); " जिनें आम्हांस ( आर्यांस ) भूमीचा आश्रय दिला " ( उत क्षितिभ्योऽवनीर विन्दः–ऋ० ६-६१-३ ); जी भयंकर, व शत्रूचा नाश करणारी आहे (घोरा वृत्रघ्नी–ऋ० ६-६१-७ ); जी सर्व नद्यांत श्रेष्ट आणि दिव्य आहे( असुर्या नदीनां सरस्वती । ऋ.७-९६-१); जिनें सप्तसिंधूंच्या पलीकडील सर्व देश आपल्या आर्यपुत्रांकडून जिंकून, निष्कंटक पृथिवी केली, व आमच्या प्रदेशांवर केव्हांहि सूर्य मावळत नाहीं, अशी वस्तुथिति घडवून आणिली ( सा नो विश्वा अतिद्विषः स्वसॄरन्या ऋतावरी । अतन्नहेव सूर्यः ॥ ऋ० ६-६१-९); इत्यादि प्रकारांचें वर्णन आढळतें.

ह्या खेरीज, "इमं मे गंगे यमुने" पासून प्रारंभ होऊन, "त्वं सिंधो कुभयागोमतीं क्रुमुं मेहत्न्वा सरथं याभिरीयसे । ( ऋ० बे० १०-७५.५,६ ) येथपर्यंतच्या दोन ऋचांत, एकंदर १९ नद्यांचा उल्लेख केला असून, त्या सर्व भारतवर्षांतील सरस्वती प्रदेशांतूनच वाहतात, आणि एक दुसरींत सामिल होऊन, हिंदी महासागराला मिळतात.

अशा प्रकारच्या श्रेष्ठतम नैसर्गीक वैभवांत, आमचे पूर्वज जन्म पावले, व त्यांतच त्यांना अलोट काव्यस्फूर्ति होऊं लागली. त्यामुळें, अनंत मार्गांनीं आणि अतर्क्य प्रमाणांनीं आमचें वाङ्मय वाढलें; व तें अनन्त असल्याचें वाटून "अनन्तपारं किल शब्दशास्त्रम्" हें महावाक्य केवळ रूढच झालें. शिवाय, हें वाङ्मय पाश्चात्य रसिकांच्या अवलोकनांतहि आल्यानें, तिकडील विद्वजनांसहि

तें तसेंच वाटलें; आणि आश्चर्यानें, त्यांनीं तोंडांत बोटेंच घातलीं. ह्यापैकीं, मी कांहींचे मासले येथें नमुद करतों.

( अ ) मॅक्समुलर म्हणतो, संस्कृत वाङ्मयाचें नानाविधत्व व त्याचा विस्तार, यांविषयीं कल्पना होण्यासारखें वर्णन करणें कठिण आहे. " It is difficult to give an idea of the enormous extent and variety of that ( Sanskrit ) literature. " ( India. What Can It Teach Us ? p 83. Ed 1883 ).

इस्लामशाहीच्या संहारांत, व फिरंग्यांच्या धामधुमींत, आमची असंख्य ग्रंथसंपत्ति नष्ट झाली. ती बाद करून देखील, ग्रीस आणि इटली या दोन्ही देशांच्या एकत्र केलेल्या वाङ्मयापेक्षां सुद्धां, संस्कृतवाङ्मयाचा विस्तार ज्यास्त दृग्गोचर होतो, असेंहि मॅक्समुलरचें मत आहे.

( आ ) सर मॉनियर विल्यम्स लिहितोः–" An adequate idea of the luxuriance of Sanskrit literature can with difficulty be conveyed to Occidental scholars. " p 1.

" In India, literature like the whole face of Nature is on a gigantic scale. " p 309.

" There is in fact, an immensity of bulk about this ( Sanskrit poetry ), as about every other department of Sanskrit Literature, which to an European mind accustomed to a more limited horizon, is absolutely bewildering. " p 309. ( Indian Wisdom. Ed. 1875 ).

( इ ) सर विल्यम् जोन्स सांगतोः—" Wherever we direct our attention to Hindu Literature, the notion of infinity presents itself. And surely, the longest life would not suffice for a single perusal of works, that rise and swell protuberent like the Himalayas, above the bulkiest compositions of every land, beyond the confines of India. " ( Sir William Jones' Works ).

असल्या काव्यात्मक अतर्क्य स्फूर्तीतच, आमच्या ऋक्कालीन पूर्वजांस आश्चर्यकारक पारमार्थिक विचारहि सुचूं लागले. हे पाहिले म्हणजे तर, कोणाचेंहि मन विस्मयानें चकित झाल्याशिवाय, खचितच राहणार नाहीं. मग, पाश्चात्य रसिक आणि विद्वान हे प्रेमाल्हादपूर्वक तोंडांत बोटें घालतील, यांत नवल तें कोणतें? ह्यापैकीं, फक्त एक दोन मासलेच मी येथें नमुद करतों.

**को ददर्श प्रथमं जायमानम्** .... ( ऋ. वे. १. १६४. ४ ).
**देवं मनः कुतो अधिप्रजातम्** .... ( ऋ. वे. १. १६४. १८).

प्राचीनकाळीं, तत्त्वज्ञानांत **ग्रीस**देश विशेष पुढें सरसावल्याचें पाश्चात्य लोक मानतात. परंतु, त्याला सुद्धां, त्याच्याहि अगोदरच्या काळांत, **भारतवर्षानें** हटविलें, आणि ज्या **परमेशाची** अथवा **परब्रह्माची** नुसती झुळक देखील त्याला प्राप्त झाली नाहीं, तेंच **परब्रह्म भारतवर्षानें** आपल्या हस्तगत केलें, असें कबूल करून, इतिहासकार **एलफिन्स्टन्** लिहितो, " And in the knowledge of the being and nature of God, they ( Hindus ) were already in possession of a light which was but faintly perceived even by the loftiest intellects in the best days of Athens " ( History of India. vol. I. pp 94, 95. Second Edition ).

हें ब्रह्मज्ञान म्हणजे, केवळ अनुभवानेंच प्रतीत होणारी वस्तु असून, ती आमच्या **भारतीय** संतमंडळीस केवळ हातचा मळच झाली होती. किंबहुना, ती सदैव झाली आहे, असें ही म्हणण्यास हरकत नाहीं. कवि **भर्तृहरि** तिला " स्वानुभूत्येकमानाय " अशी संज्ञा देतो, व एकनाथ संतकवि तिचें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें करतो.

**ब्रह्मज्ञानाची किल्ली । मी सांगेन एकेचि बोली ।**
**ज्याची कल्पना निवाली । तो प्राप्त पुरुष ॥**

( स्वात्म

आतां, आमच्या पारमार्थिक ज्ञानाचा, ह्या अतुल काव्य-स्फूर्तीचा, आणि प्राचीन देशवैभवाचा काळ तरी कोणता असावा, याबद्दलचें अवश्य तें दिग्दर्शन येथेंच केलें पाहिजे.

## आमच्या काव्यस्फूर्तीचा आणि देशवैभवाचा काळ.

हा काळ तृतीय युगांतला असून, तत्संबंधाचें प्रमाण मी सत्वरच देणार आहे. अर्थात्, तो इटली, ग्रीस, आणि मिसर (ईजिप्त), यांपेक्षां पुष्कळच पुराणतर असून, ती गोष्ट पाश्चात्य इतिहास-कारांनीं देखील स्वीकृत केली आहे, असें खालील उताऱ्यावरून व्यक्त होईल.

" Ere yet the pyramids looked down upon the valley of the Nile—when Greece and Italy, those cradles of modern civilization housed only the tenants of the wilderness, India was the seat of wealth and grandeur. " ( Thornton's History of India. vol I. p 2 ).

गिबन्चा देखील अशाच मासल्याचा अभिप्राय आहे. तो लिहितो, " In the more early ages of the world, whilst the forest that covered Europe afforded a retreat to a few wandering savages, the inhabitants of Asia were already collected into populous cities, and reduced under extensive empires, the seat of the arts, of luxury, and of despotism. " ( Vide Decline and Fall of the Roman Empire. vol I. p 156. Chandos Classics. Ed 1893 ).

ह्याच तृतीय काळांत आमच्या ऋग्वेदर्षींनीं ज्योतिष, भूस्तर, वैद्यक, भाषाशास्त्र, व्याकरण, तौलनिकपुराणशास्त्र, हस्तस्पर्श-रसायन, किरणविच्छेद व त्याचे सात रंग, सप्तस्वर, इत्यादि अनेक शास्त्रें व कला, आपल्या बुद्धिवैभवानेंच उत्कर्षाप्रत आणिलीं.

येथें, ज्या प्राचीनतम कालांत आमचे भारतीय आर्यपूर्वज

अशा शोधांचा ऊहापोह चालवीत होते, त्याचें मी किंचित् दिग्-दर्शन करतों. हा अर्थात् ऋग्वेदकालच होय. ऋग्वेदाची रचना तृतीय युगांत, म्हणजे हैमकालापूर्वीच झाली असावी, अशी माझी अल्प समजूत आहे. कारण, हिमप्रलयाचा उल्लेख ऋग्वेदांत, अथपासून इतिपर्यंत कोठेंसुद्धां, आढळून येत नाहीं. परंतु, तोच अथर्व-वेदांत ( हिरण्ययी नौरचरत् । इत्यादि १९.३९. ७ मध्यें ) आढ-ळून येतो; व अथर्व वेदापूर्वीचा ऋग्वेद असल्याविषयीं, अगदींच संशय नाहीं. शिवाय, **एकाचेतत्सरस्वती नदीनां शुचिर्यती गिरिभ्य आसमुद्रात्** ॥ (ऋ. व. ७. ९५. २), या ऋचेवरून, ज्या वेळीं ही ऋचा रचली, त्यावेळीं सरस्वतीनदी हिमा-लयांतून निघून ( राजपुताना ) समुद्राला मिळालेली असल्याचें, आणि तें द्रष्ट्यानेंहि पाहिल्याचें उघड होतें. म्हणूनच, हैम-युगोद्भव संप्लवापूर्वी, सरस्वती नदी ( राजपुताना ) समुद्राला मिळाली होती; व संप्लवामुळेंच, ह्या समुद्राच्या ठिकाणीं वाळवंट होऊन ती तेथेंच गुप्त झाली; आणि उत्तरेकडे सुमारें पन्नास कोसांवर दिसूं लागली; याविषयीं अगदींच शंका रहात नाहीं.

हैमयुग सुरूं झाल्याला, सुमारें २, ४०, ००० वर्षें झालीं; तसेंच, तें १, ६०, ००० वर्षें टिकलें; व तें नाहींसें होऊन, हिमोत्तर काळ लागल्याला अजमासें ८०, ००० वर्षें झालीं; इत्यादि प्रतिपादन डाक्तर क्रोल नांवाचे भूस्तर शास्त्रज्ञ आणि ज्योतिःशास्त्रविशारद, तत्तच्छास्त्राधारानुसार, करतात. ( Vide Climate And Time, and Climate And Cosmology. By Dr. Croll ). परंतु, अन्य तज्ज्ञाच्या मतें, म्हणजे पौरस्त्य भारतीय शास्त्रज्ञ व पाश्चात्य स्पेन्सरादि तज्ज्ञ यांच्या समजुतीप्रमाणें, हैमयुग संपल्याला (महाभारत वनपर्व. १८८. २१-२८ कलकत्ता आवृत्ति पहा) १२०००वर्षांपासून तो ३२,०००, व ८०,०००

वर्षांपर्यंतचा काळ लोटला असल्याचें होत आहे. मात्र, येथें आणखी एक फारच महत्त्वाची गोष्ट अवश्य ध्यानांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, उद्भवलेला हैमकाल एकंदर किती वर्षे राहिला अथवा टिकला, याचा उल्लेख डॉ. क्रोल खेरीज कोणीच केलेला नाहीं. तथापि, १२,००० वर्षांपासून तों ३२, ०००, आणि डॉ. क्रोलच्यामतें ८०, ००० वर्षे हिमयुग संपल्याला झालीं, म्हणून जें सांगण्यांत आलें, त्याचा विचार करून सरासरी काढतां, हिमयुग संपल्याला ४१,००० वर्षे झाल्याचें व्यक्त होतें. ह्यांत, त्याच्या स्थिरत्वाचा काळ सामील केला म्हणजे, त्याच्या पलीकडील तृतीय युग होय. ह्यांतच ऋग्वेदाची रचना झाली, असें माझ्या अल्प मतीस वाटतें; व ऋग्वेद हे तृतीय युगकालीन, आणि अतएव हैमयुग सुरू झाल्यापूर्वीचेच असल्याविषयीं सिद्ध होतें.

## आम्हीं दिलेले स्वराज्याचे धडे.

आतांपर्यंत, आमच्या प्राचीनतम ज्ञानसामग्रीचा व तिच्या कालाचा आपणांस केवळ अल्पांशच दाखविला. सबब, यानंतर, ऋटकालीन ऋषींनीं आमच्या हितार्थ स्वराज्याचे जे धडे घालून दिले, व जे अंग्लो-सॅक्सन, अन्य पाश्चात्य, आणि पौरस्त्य राष्ट्रें, यांस मार्गदर्शक झाले असल्याचें स्मृतिवचनावरून कळतें ( एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः । स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥ म. स्मृ. २. २० ), त्यांचा अवश्य तो तपशील देण्याचें मीं योजिलें आहे.

आम्हीं आंग्लांस व पाश्चात्यांना पुष्कळच सक्रिय असे महत्त्वाचे धडे दिले. परंतु, त्यांच्याकडून जें आम्हांस मिळालें, त्यांत मुळांतील ओजस्विता आणि उपयुक्तता कोठेंहि नसून, उलट त्यांच्या ऐवजीं, कवडी किमतीचा व लज्जास्पद कचरा मात्र आम्हांस देण्यांत आला आहे. ही गोष्ट कांहीं पाश्चात्यांसहि कबूल असून, ह्यासंबंधानें मेन नांवाचा एक आंग्ल लिहितोः—
*"I must honestly admit that much, which had*

नं. १७-२०
ता.

*a grandeur of its own, is being replaced by a great deal which is poor and ignoble.*" ( Sir Henry Maine's Village-Communities. p 26. Ed. 1890 ).

ह्यांतील इतालिक वर्ण माझे आहेत. ( नाना पावगी ).

सामान्यत:,भारतीय आर्यांची मूलप्रकृति पारमार्थिक विचारांची, आणि अतएव सात्विक वृत्तीची असल्यानें, त्यांना कोणीहि अन्याय केलेला, किंवा कोणावर जुलुम झालेला खपत नाहीं. म्हणून, ऋक्कालीन ऋषींनीं देवाजवळ ज्या कित्येक मागण्या केल्या, त्यांपैकीं, एक फारच महत्त्वाची आहे. सबब, तिची विशेष उपयुक्तता जाणून, ती मी येथें नमुद करतों.

**हत वृत्रं सुदानवः । ... मानो दुःशस ईशत ।**
**( ऋ० वे०** १.२३.९).

**भावार्थः** –अहो देवांनो ! शत्रूचा संहार करा, व आम्हांवर, ( तसेंच आमच्या पुत्र-पौत्र-प्रपौत्रादि वंशजांवर, ) दुष्टांचें प्रभुत्व केव्हां सुद्धां राहणार नाहीं, असें होऊं द्या.

ह्यावरून, आमच्या ऋक्पूर्वजांस, तितक्याहि प्राचीनकाळीं, दुष्टांच्या प्रभुत्वाचा मनापासून कंटाळा होता, हें सिद्ध होतें.

आतां, **मा नो दुःशंस ईशत** । म्हणजे "आमच्यावर दुष्टांचें प्रभुत्व नको, इतकी प्रार्थना करूनच आमचे ऋक् पूर्वज राहिले नव्हते. तर, त्यांची उडी, किंबहुना त्यांच्या मनाची धांव, याच्याहि पलीकडे गेलेली दिसते. कारण, ऋग्षिनिर्मित ज्या तीन संस्था ( **त्रींणि सदांसि**...**ऋ० वे०** ३. ३८. ६.), म्हणजे **१ विदथ, २ समिति, व ३ सभा,** या नामधेयांनीं सुप्रसिद्ध आहेत, त्यांतील लोकनियुक्त प्रतिनिधींनीं एकत्र जमावें(संगच्छध्वम्....।ऋ०वे०१०. १९१. २ ), त्यांनीं विचारविनिमय करून एकमेकांचें विचार घ्यावे (संवदध्वम्...। ऋ०वे०१०.१९१.२.), सर्वांच्या मतानुसार एकच गोष्ट ठरवावी ( संवोमनांसि जानताम्...। ऋ०वे०१०.१९१.२), तींत मतैक्य करावें ( समानं मनः समानो मंत्रः ... । ऋ० वे

१०. १९१. ३ ), आणि सर्वांचा एक निश्चय असल्याचें पाहून ( **समानीव आकूतिः समाना हृदयानि वः ...।** ऋ० वे० १०. १९४. ४ ), त्यांत सर्वानुमतें पसंत ठरलेल्या गृहस्थास बोलवावें; व " सर्व प्रजेनें तुलाच राजा निवडला आहे; यासाठीं, तूं अचल राहून निरंतर राज्य कर; मात्र, ( अविहित कृत्य करून, त्या योगानें) राज्यपदापासून भ्रष्ट होऊं नकोस," असें त्यास सांगावें.

ह्या संबंधाचे ऋग्वेदांतील उतारे फारच महत्वाचे असल्याकारणानें, ते मी येथें वाचकांच्या अवलोकनार्थ देतों.

( अ ) **विशस्त्वा सर्वा वांछंतु मा त्वं राष्ट्रमधिभ्रशत् ॥**
( ऋ० वे० १०. १७३. १ ).

( आ ) **संगच्छध्वं । संवदध्वं । सं वो मनांसि जानताम् ।**
( ऋ० १०. १९१. २ ).

( इ ) **समानो मंत्रः । समितिः समानी ।** (ऋ० १०.१९१.३).

( ई ) **समाना हृदयानि वः** ( ऋ० १०. १९४. ४ ). **समानीव आकूतिः** ( १० १९४. ४ ).

ह्या नन्तर, अथर्व वेदांत देखील, सभा व समिति नांवाच्या ज्या राजनिर्मित संस्था होत, त्यांनींच आमचें रक्षण करावें, अशी प्रार्थना आहे.

**सभा च मा समितिश्चावतां प्रजापतेर्दुहितरौ ॥**
( अ० वे० ७. १२. १ ).

शिवाय, ह्या सभेंतील ठराव वज्रलेप, ह्मणजे मुस्तकीम व केव्हांही न बदलणारे असत. अर्थात्, सांप्रतच्या राजनीतींतील तत्वानुसार, कालचें बोलणें आज नाहीं, आजचे बोलणें उद्यां नाहीं, आणि उद्यांचें परवां नाहीं, अशाप्रकारचे ते नसत, हें सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आणि म्हणूनच ह्या संबंधाची महत्वाची ऋचा मी येथें नमुद करतों.

**विद्म ते सभे नाम । नरिष्ठा नामवा असि ॥** ( अ०वे०७.१२.२)

***भावार्थ***—हे सभे! तुझें नांव आम्हांला विदित आहे. तुला

वा.नि.
९८



मराठी ... संग्रहालय
नोंद ...

नरिष्ठा ह्मणतात. कारण, तूं केलेले ठराव वज्रलेपासारखे अक्षय्य, व ध्रुवाप्रमाणें अचल असतात.

अशा प्रकारची वस्तुस्थिति इतकें सहजींच व्यक्त करते कीं, वेदकाळीं लोकनियुक्त राजा असे; व प्रजेचें पालन लोकेच्छेप्रमाणें, आणि लोकमतानुसारच होई. त्यामुळें, प्रजेवर केव्हांसुद्धां जुलूम न होतां, ती सदैव संतुष्ट राही, व "धमकीसे चलाव" या जुलमी राज्यपद्धतीचें वारें, लोकांच्या कानांवर देखील कधीं जात नसे.

ऋक्कालीन प्रजा असें सदैव प्रतिपादन करी कीं, आम्हां जानपदांस मार्गदर्शक म्हणून, सुसंस्कृत व राजकार्यधुरंधर नेत्याची खरी आवश्यकता आहे. परंतु, तो लोकांचा, म्हणजे लोकांनीं पसंत केलेला, अथवा लोकनियुक्तच पाहिजे. दुसरा कोणीसुद्धां नको. कारण, ह्यासंबंधाचे आधार प्रत्यक्ष ऋग्वेदांतच खालीं लिहिल्याप्रमाणें, अनेक दृष्टीस पडतात:—

(१) आ त्वा हार्षमन्तरेधि ध्रुवस्तिष्ठाऽविचाचलिः।
विशस्त्वा सर्वा वांछंतु॥ ( ऋ० वे० १०.१७३. १).
(२) ध्रुवो राजा विशामयम्। ( ऋ० वे० १०.१७३.४).

**भावार्थ**:—(१) अरे, आमच्यांत ये, अचल रहा, आणि तुझ्या बद्दल, म्हणजे तूंच राजा व्हावास, अशी सर्वजण इच्छा प्रदर्शित करोत.

(२) हा सर्वांनीं पसंत केलेला राजा, ध्रुवासारखा स्थिर राहो.

अशा रीतीनें निवडलेल्या राजाला, राज्याभिषेक होण्यापूर्वी, अशी एक शपथ घ्यावी लागे कीं, "जर मी प्रजेला कोणत्याहि प्रकारें त्रास दिला, तर तिनें माझें सर्वस्व हरण करण्यास मी पात्र होईन." इष्टापूर्तं मे लोकं सुकृतमायुः प्रजां वृंजीथा यदि ते द्रुह्येय मिति। ( ऐतरेयब्राह्मणे अष्टमपंचिकायां ४. १५ ).

एवंच, ह्या धार्मिक व नैतिक बंधनानेंच आमच्या सत्ताधीश वर्गाचें नियंत्रण झालें; आणि प्रजेचें सुख, तिचें कल्याण, व तिचा संतोष राखण्याविषयींच ह्यानें आपली तत्परता व्यक्त केली

ह्या कामांत, श्री–रामचन्द्रासारख्या प्रजाप्रियराजानें तर, निःसीम प्रजावात्सल्य निदर्शनास आणलेलें दिसतें, आणि प्रजेच्या सुखार्थ, आपण कोणतीहि झीज सोसण्यास तयार असल्याविषयीं, त्यानें उद्‌गार काढलेले आढळतात.

**स्नेहं दयां तथा सौख्यं यदि वा जानकीमपि ।**
**आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥**

किंबहुना, हीच वस्तुस्थिति मनांत आणून, मुत्सद्दी व इतिहासकार हण्टर लिहितो कीं, ब्राह्मण हे सुसंस्कृतींत मुरलेले, आणि स्वतेजानेंच उदयास आलेले दिसतात. केवळ, सत्तेच्या जोरावरच स्वप्रभुत्व न गाजवितां, अथवा धमकीसे चलाव, किंवा बिठाव कैदमें, अशा दंडुकी शाहीवर, स्वसत्तेचा दुरुपयोग न करतां, निव्वळ आनुवंशिक ज्ञानबलावर, व संयमनिग्रहादि साधनांनींच, ब्राह्मणांनीं ह्या देशांत प्रभुत्व मिळविलें, आणि आपल्या हातांत तें राखलें.

एवढेंच नव्हें तर, ब्राह्मणांनीं जें साम्राज्यवर्चस्व संपादिलें, त्याचा त्यांनीं केवळ प्रजेच्या हितार्थच सर्वांशीं उपयोग केला. हंटर म्हणतो,

"The Brahman ... ( is )—the man of self centered refinement. He is an example of a class, becoming the ruling power in a country, not by force of arms, but by the vigour of hereditary culture and temperance."

"The paramount position which the Brahmans won, resulted in no small measure, from the benefits which they bestowed." ( Vide Indian Empire. pp *96, 97*. Second Edition ).

अशा प्रकारें, ह्या भरतखंडांत आम्हां भारतीय आर्यांचें स्वराज्य, म्हणजे देशी राजांचेंच अखंड प्रभुत्व असल्यानें, प्रजेचें कल्याण करण्यांत, व तिचे कोणत्याहि प्रकारें हाल न होतां तिला सौख्य देण्यांतच, आम्हांला धन्यता वाटे; एवढेंच नव्हेतर, तसें करून

आम्ही आपली खरी इतिकर्तव्यता बजाविल्याबद्दलहि आम्हांस सदैव अत्यानंद होई; आणि त्यामुळें, **प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मनाम् ।** या वाक्याची सफलता दृष्टीस पडे.

शिवाय, सामान्यतः, आम्हां भारतीय आर्यांचा असा कांहीं जन्मतःच स्वभाव बनलेला आहे कीं, यच्चावत प्राणिमात्राला निरंतरसुख, स्वातंत्र्य, आणि शेवटीं मुक्ति मिळावी, अशी त्यांची सदैव इच्छा असते, व तत्संबंधानें ते अहर्निश प्रयत्नसुद्धां करितात. कारण, आम्हीं स्वतः गुलामगिरींत केव्हांहि दिवस काढलेले नसल्यानें[1], दुसऱ्यास गुलाम करणें आम्हांला केव्हां देखील इष्टच वाटत नाहीं. परंतु,तसें आंग्लराष्ट्राचें नसून,इंग्लंडची दोन तृतीयांश आंग्ल-साक्सन लोकसंख्या पूर्वी केवळ गुलामच असल्याविषयीं, डॉ. विल्यम् कॉलियर लिहितो (Collier's Britissh Empire. Ed. 1882, pp 41-42 ). ही स्थिति, बहुतकालपर्यंत एकसारखी चालली. त्यामुळें, दुसऱ्यास गुलाम करण्यांत, आंग्लांना कधींसुद्धां किंतूच वाटला नाहीं, व अजूनहि तो वाटत नाहीं. एवढेंच नव्हे तर, दुसऱ्यांस गुलाम बनवून, त्यांस आपले दास आणि अंकित करण्यांतच त्यांना एक प्रकारचें भूषण वाटतें, व हें ते मोठ्या दर्पानें इतस्ततः मिरवितात, हें आश्चर्य होय! उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील बत्तीस कोटप्रजा आपल्या हातांतली बाहुलींच आहेत, असें हे आंग्ल मोठ्यादिमाखानेंच सांगतात; आणि सर्व आशियाखंडांतील राजे, कांहीं अपवाद खेरीजकरून, सोनेरी पिंजऱ्यांतील दिखाऊ पोपटच (Linnets) असल्याविषयीं, मंत्रिमंडळाच्या प्रभावळींतील कर्झनसारखें पुढारी मंत्री देखील, बेधडक धिक्कारबुद्धीनेंच बोलतात.

---

१ (अ) Megasthenes ( Arrian, Indika, ch x ) "affirmed it to be a great thing in India, that all the Indians were free and that no Indian slave existed."

( आ ) "There was no slavery among the Tamils." ( V. Kanakasabhai. The Tamils Eighteen Hundred Years Ago- p 114 ).

ह्याचें कारण मुख्यत्वेंकरून व तत्वतः, हेंच आहे कीं,

**प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ।**

अर्थात्, गुलामगिरीच्या स्थितींत, किंवा तत्सदृश अवस्थेंत, ही **आंग्ल-सॅक्सन** प्रजा इ.स. पूर्वी५४ पासून पिढ्यान्पिढ्या वाढली, व स्वदेशांतल्याहि बलहीन लोकांवर स्वामित्व गाजवून,त्यांस हिनें गुलाम केलें; आणि कालान्तरानें, स्वकीयांची व स्वदेशजांची, ही गुलामांची संख्या आपोआपच वाढत गेल्यानें, धनप्राप्त्यर्थ गुलामांचा व्यापार करणेंच **आंग्लांना** इष्ट वाटलें; आणि म्हणूनच, त्यांनीं राजरोसपणें गुलामांचा व्यापार चालविला.

पुढें, इ. स. च्या सहाव्या शतकांतील **आंग्लो-साक्सन्** कालांत, प्रत्यक्ष इंग्लंडमध्येंच, **ब्रिस्टल** हें अति निंद्य अशा गुलामांच्या व्यापाराचें मथक, आणि अतएव इंग्लंडच्या अपकीर्तीचें केन्द्र-

---

१ (अ) **सॅक्सन्** लोक स्वभावतः क्रूर, विश्वासघातकी, कायदे भंग करणारे, जाळ-पोळ-लुटींत वावरणारे, इत्यादि असल्याबद्दल, प्रमाणभूत इतिहासकारच लिहितातः-(See Historians' History of the World.' vol vii. pp 524, 525 ).

(आ) The invaders of England from beyond the North-Sea were called "Pirates of the North-Sea," or " the Sea-Rovers. " ( The Empire History. Ed. 1891. pp 35, 36, 38, 45 ).

(इ) Dr. Collier designates the three tribes that invaded England, viz the Jutes, Angles, and Saxons, as " the pirates of the Danish and German Coasts. " ( History of the British Empire. Edition 1882. p 19 ).

(ई) " The lowest class, the slaves (in England), were the most numerous They were chiefly prisoners taken from the old British tribes, in war, and others sold into slavery ... ( The Empire History, p 38. Ed 1891 )

स्थान झालें. ह्यांतील गुलामांच्या संख्येंत, रोमन्स, सॅक्सन्स, ज्यूट्स, डेन्स, नॉर्मन्स, व अन्य टयूटॅानिक जातींनीं इंग्लंडवर एकसारख्या स्वाऱ्यांवर स्वाऱ्या करून जी तेथें कत्तल उडविली, जाळपोळ आणि लूट केली, व चाचेगिरी, चौर्य, आणि लुंठनादि क्रियेची दुषणाई परंपरा चालविली, तिला कंटाळून, पुष्कळ जित लोक रानावनांत व दरी-खोऱ्यांत गेले, आणि क्षुत्पिपासेला वश होऊन, ज्यांनीं शेवटीं गुलामगिरी स्वीकारली, त्या सर्वांचा समावेश होतो.

अशाप्रकारें, गुलामांची संख्या प्रतिवर्षीं वाढत गेली, व ब्रिस्टल हें गुलामांच्या व्यापाराचें खुद्द इंग्लंडांतीलच मुख्य ठाणें झाल्यानें, येथूनच ते ठिकठिकाणीं विक्रीसाठीं रवाना होत गेले. फार काय सांगावें, पण, हेच गुलाम, रोमच्या मंडईंत देखील नेण्यांत येत, आणि तेथें त्यांचा क्रयविक्रय होई.

हाच गुलामांचा व्यापार किफायतीच्या जोरावर खंडांतरीं गेला, व निव्वळ जुलमी कायदा, आफ्रिकेंतील पकडून नेलेल्या लोकांविरुद्ध अन्यायानें मंजूर करण्यांत येऊन ( Geo ii. C. 7 ), इंग्लंडनें आपलें कृष्णमुख अखिल जगास दाखविलें, आणि फजिती मात्र अचानक पदरांत घेतली. इ. स. १८०७ सालीं, गुलामांचा व्यापार बंद झाल्यावर देखील, इंग्लंडच्या ताब्यांत आठ लक्ष गुलाम होते, ही गोष्ट सदैव ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. (vide The Growth of English Industry and Commerce, in Modern Times. By W. Cunningham. D. D. vol ii. pp 311, 314-317. Ed. 1892 ).

कारण, द्रव्यलोभानें, निरपराधी व बलहीन झालेल्या आफ्रिकेंतील काळ्या लोकांस जुलमानें पकडून गुलाम करणें, एकंदर सर्व कुटुंबांचीताटातूट झाल्यावर, त्यांच्या पोटापाण्याची देखील बिलकुल दाद न घेणें, आणि त्यांस केवळ पशूंप्रमाणेंच वागविणें व विकणें, इत्यादि अतिनिंद्य व निर्घृण कृत्य जें आंग्लराष्ट्र करी, त्यास लौकिकांत

फारसा मान मिळत नसे; किंबहुना, आंग्लनामधेय हें तिरस्काराचें एक द्योतक चिन्हच मानण्यांत येई; त्यांत नवल तें कोणतें? फार काय सांगावें, पण, ह्याच वित्ततृष्णेनें इंग्रजांची वणिग्वृत्ति दिवसानुदिवस निर्मर्याद वाढली जाऊन, ह्यांच्या नांवाला इतस्ततः कालिमाच लागली.

ह्यासंबंधानें, एक आंग्ल इतिहासकार लिहितोः —
" From the earliest Saxon times, tho evil ( of *villenage* or *slavery* ) had prevailed in England. The Norman conquest had changed the masters without freeing the slaves. ... ... When, it was a disgrace to be called an Englishman. " ( Dr. W. Francis Collier's History of the British Empire. p 141. Edition 1882 ).

ह्यानन्तर, गेल्या एकोणीसाव्या शतकांत ( इ. स. १८४० सालीं ), लॉर्ड मेकॉले असें स्पष्टच लिहितो कीं, " From his ( Clive's ) first visit to India ( 1746 ), dates the renown of the English arms in the East. Till he appeared, his country-men were dispised as mere pedlars, while the French were revered as a people formed for victory and command." ( Mecaulay's Essay on 'Lord Clive' ).

ह्यावरून, आंग्लांची वणिग्वृत्ति पाहून, वणिग् राष्टांतच प्रथमतः त्यांची गणना होई; व खुद्द आंग्लच ती गोष्ट कबूल करितात ( We have baen called a " nation of shopkeepers " Empire History. p 222 ). परंतु,पुढें, १७५७सालीं,प्लासीची लढाई क्लाईव्हनें मारल्यावरच, ते नांवारूपास येत चालले, असें दिसतें. तथापि, अनिवार कांचनतृष्णेनेंच आपला पगडा त्यांजवर बसविला. त्यामुळें, त्यांचें नांव बंगाल प्रान्तांत चोहोंकडे कुलांगारवत झालें, व त्याला इतका असह्य दुर्गंध सुटला कीं, खुद्द क्लाईव्हला देखील ती गोष्ट कबूल करणें भाग पडून, तो लिहितो, ... ... " the gomasthas to the Company's servants, ... ... under the sanction of their names, have committed

actions which *make the name of the* English *stink in the nostrils* of a Gontoo and a Mussalman." ( Malcolm's Life of Clive. vol ii ).

तथापि, मराठा साम्राज्याचा दरारा सर्वत्र असल्यानें, त्याला इस्लाम आणि इंग्रज हे दोघेहि सारखेच वचकून व भिऊन असत. अर्थात्, ह्याच कारणानें, मेकॉले म्हणतो, "And soon after his ( Aurangzebe's ) death, every corner of his wide empire learned to tremble at the mighty name of the Mahrattas." ( Macaulay's Essay on Lord Clive ).

आम्हां मराठ्यांच्या पराक्रमापुढें, इंग्रज सुद्धां गोगलगायीसारखे असत, व मोठ्या आदबीनें आणि नम्रतापूर्वकच ते आपलें मागणें आमच्या जवळ वेळ पाहून करीत. अठराव्या शतकांत, मराठ्यांचा प्रतापसूर्य मध्यान्हीं आल्याबेळीं, केवळ आमचें नांव ऐकूनच इंग्रजांचा थरकांप होई; व म्हणूनच मेकॉले लिहितोः— "Even the Europeon factors trembled for their magazines ... ... and the name of the Maratha ditch still preserves the memory of the danger."
( Lord Clive ).

त्याचप्रमाणें, सेनापति चिमणाजी आपासाहेब पेशवे यांनीं मोठ्या शौर्यानें वसईचा किल्ला सर केला, व तो फिरंग्या-( पोर्तुगीज ) कडून इ.स. १७३९ च्या मे महिन्यांत घेतला. त्यावेळीं, इंग्रजांची पांचावर धारण बसली, व मराठ्यांची खुशामत करून, त्यांचें प्रेम संपादन व्हावें, एतदर्थ, त्यांस नझराणा, भेट, इत्यादि देखील इंग्रजांनीं पाठविली; आणि मग, गॉर्डननें शाहूमहाराजांची समक्ष भेट व्हावी, अशा हेतूनें विनंतिहि केली. पुढें, मुलाकत झाल्यावर, शाहू-महाराजांनीं गॉर्डनास प्रश्न केला कीं, "वसईचा किल्ला मराठ्यांनीं सर केल्यामुळेंच तुमचा जीव भीतीनें संत्रस्त होऊन, केवळ संक्षोभशमनार्थच ही भेट घेण्यांत आली असावी." त्यावर गॉर्डननें उत्तर दिलें, "मित्रत्वासाठींच मी आपल्या पायांपाशीं आलों आहे."

आतां, कित्येक वाचकवर्गास, अस्सल हकीकत ज्या पोषा-कांत सजविली आहे, तो पहाण्याची खचितच उत्कंठा असेल ...

साहजिक आहे. सबब, तत्कुतूहलपारणार्थ, उपलब्ध असलेला मजकूर मी येथें देतों. गॉर्डन लिहितोः--

" Shahu also put the startling question, whether, 'dread of the Marattas had not occasioned the visit,' to which answer was given that 'friendship alone moved us.' " (Forrest's Selections from State Papers of the Bombay Secretariate. 1885. Introduction. p vi ).

## प्रातिनिधिक स्वराज्यांत आमची आघाडी
## आणि
## आंग्लांची पिछाडी.

मागील विवेचनावरून, तृतीय युगांत, म्हणजे लाख पन्नास हजार वर्षां पूर्वींपासूनच्या काळांत, आम्ही **भारतीय आर्य** प्रातिनिधिक स्वराज्यविषयकचर्चा चालवीत होतों ( मागील पान ९, १०, ११ पहा), व **सॅक्सन आंग्लांच्या** जन्मकालाला अजून दोन हजार वर्षें देखील झालीं नाहींत, एवढी महत्त्वाची गोष्ट वाचकांनीं अवश्य लक्षांत ठेवावी. ( पुढील सिंहावलोकन पहा ).

पुढें, अगदीं नवथरच, म्हणजे चालू इ. स. १९२५ च्या अव्वलीस, किंबहुना गेल्या मार्च अखेरच्या आंतच, आमच्या **भारतीय** बालवीरांशीं सामना करण्यासाठीं, कसलेल्या **नोकरशाही**तील **आंग्ल** वीरमन्यांनीं आखाड्यांत उडी घालून, त्यांच्यांशीं दोन हात केल्यावर, **आंग्लांची** फटफजिती झाल्याचें **आंग्ल** प्रभूसच मुकाट्यानें कबूल करावें लागलें. कारण, वाग्युद्धांत, ह्यांचे आणि आमचे परस्पर अनेक तीव्र सामने होऊन, शेवटीं नोकरशाहीसच हार खावी लागली, ही गोष्ट आतां अखिल जगास सर्वत

---

१ एतद्विषयक विपर्यास केल्याचा कोणताहि दोष मजवर येऊं नये म्हणून, मी मुळांतला उतारा बहुतेक जशाचा तसाच येथें देतोंः-

विदित झाली आहे. शिवाय, हिंदुस्थानचें साम्राज्यशकट चालविण्याची आंग्लांची पात्रता नसल्याचें, म.गांधी, दादाभाई नवरोजी, बाई आन्बेझण्टादि लिहित असल्याविषयीं, वारंवार आढळतें. ( vide Mr. Gandhi's utterances in respect of Satanic English Government, Dadabhai Nowroji's UnBritish Rule in India, Bombay Cronicle of 26–6–25, p 6; 25–3–25, p 12; 28–4–24, p 8 ).

अशी वस्तुस्थिति असतांना देखील, केवळ राजमदाच्या जोरावर, आम्हां हिन्द प्रजेस बाजूला ठेवून, आंग्ल प्रभू न्याय अन्याय न पाहातां, ली-लुटीच्या परवणींत, केवळ स्वतःच्या पोळीवरच्च एकसारखें तूप ओढीत आहेत; व तेंहि पंधरा कोटी हिंद प्रजा उपाशी व अर्ध पोटी ठेवून, आणि आमच्यावर

---

... " The Legislative Assembly met on March 14, 1925, for the fifth and last sitting ... Pandit Motilal Nehru moved an omission of a whole demand for the Executive Council, ... which he said was a very comprehensive one ... It was a motion of censure on the Government of India, and the Swaraj party would vote for it on the principle of refusal of supplies before the redress of grievances. "

त्यानंतर, दोन्ही पक्षांत खडाजंगी वाद आणि भवति न भवति होऊन, पुढें तो अध्यक्षांच्या आज्ञानुसार बंद करावा लागला. तदनन्तर, सर्वांचीं मतें घेतल्यावर, पंडित मोतीलाल नेहरू यांच्या सर्वोपरि छाटाछाटीसच सतरा मतें अधिक मिळून( म्हणजे ४८ विरुद्ध ६५ मतें पडून ), पंडितजींच्या सूचनेसच यश आलें, व नोकरशाहींचा सहजींच हिरमोड व पाडाव झाला.

" At five o'clock, when Alexander was still on his legs, the President applied the guillotine, and the debate was thus cut short. The motion of Pandit Motilal was carried by 65 votes to 48, amidst loud unofficial applause." ( vide the Bombay Chronicle of 16 March 1925. pp 7, 8 ).

निष्कारण अपात्रतेचा ठपका आणून, ओढीत आहेत; याबद्दल कोणासहि वाईट वाटल्या वाचून खचितच राहणार नाहीं.

## आंग्लगर्वोक्ति व वृथा आत्मस्तुति.

असा प्रकार असून देखील, "स्वराज्य चालविण्याच्या पात्रतेचें चिन्ह पौरस्त्य राष्ट्रांत केव्हांहि कोठेंच दिसत नाहीं," असें इंग्लडचा माजी प्रधान बॅल्फर, यानें इ. स. १९१० सालीं, १४ जून रोजीं, इजिप्त संबंधीं उद्भवलेल्या प्रश्नांत, ध्वनित केलें होतें:— "No Oriental nation had ever shown any trace of capacity for self Government." अर्थात्, स्वराज्य विषयांत इग्लंड अगदीं मुरलेलें आहे, असें प्रदर्शित करण्याचा त्याचा अन्तस्थ हेतु होय. त्याचप्रमाणें, विश्वकोशांत, म्हणजे एन्सायक्लोपीडिया ब्रिटॅनिका नामक कोशांत, स्वराज्य विषयक आत्मश्लाघेची आणि परनिन्देची अगदीं रेलचेल उडालेली आढळते (vide vol xi. pp 10, 20. Ninth Ed). किंबहुना, सत्याला बाजूला सारून, आणि असत्यालाच सर्व दिखाऊ पोषाक देऊन, व त्याजवर सोनेरी मुलामा चढवून, तें सुशोभित करण्यांत, इग्लंडचा हातखंडा!(माझें इंग्रजी वेदकालीन व वेदोत्तरकालीन स्वराज्य. पान ३३१-३३३, ३८४, ३८५, व पुढील सिंहावलोकन पहा). असे निरर्गल लेख इलंग्डचे मुत्सद्दी, राज्यसत्ताधारी, नामांकित निबंधकार, तत्त्ववेत्ते, इत्यादि नेहेमीं लिहितात. परंतु, त्यांचा व्हावा तितका प्रतिकार होत नाहीं. लॉर्डलिटन बहादुर, माजी बंगालचेगव्हरनर, आणि सांप्रतचे गव्हरनर जनरल व हिन्दचे व्हाइसरॉय, यानीं आमच्या हिन्दी स्त्रीजनावर कसा हल्ला केला, हें सर्वांस सुविश्रुत असल्यामुळें, त्याचें चर्वितचर्वण मी करीत नाहीं. तथापि, हाच प्रमाद आम्हां हिन्दी जनांकडून एकाद्या गौरकाय स्त्रीसंबंधी घडला असता, तर सर्व गौरकायांनीं सरकारच्या सहाय्यानें, आम्हांला अगदीं थैमान करून सोडलें असतें! परंतु, आम्हांला कोणाचाच पाठिंबा नसल्यानें,

मुद्रणद्वारा याबद्दलची चळवळ झाली असतांहि, आम्हांला निव्वळ मूगच गिळावे लागले ! हा केवळ काळाचाच महिमा होय !

ज्या संस्कृत वाङ्मयाचा स्तुतिपाठ पाश्चात्य तज्ज्ञच गात असतात, ( मागील पान ४, व यासंबंधाचे दुसरे आधार मी आपल्या Self-Government &c नांवाच्या इंग्रजी ग्रंथांत दिले आहेत, ते पहावे. पान२-४३, ८७, २७६-२८२,२९७ ), त्यालाच मेकॉले कवडीमोलाचें समजतो; ज्या वेद वाङ्मयाचें महत्त्व अतुल असल्याचें मॅक्समुलर लिहित असतो, तेच वेद कपटी ब्राह्मणांची कूटरचना असल्या विषयीं, स्कॉटलंडचा डयूगल्ड स्टुअर्ट लिहितो; ज्या क्लाईव्हनें आवदानांवर आवदानें मारून, खोटा दस्तैवज बनविण्यासाठीं दुसऱ्याची सही स्वतः केली, लाखों रुपये घशांत घातले, बंगालच्या रयतेला त्राहि भगवन्! करून सोडलें, व म्हणूनच ज्याला इंग्लंडचे लोक सुद्धां मूर्तिमंत राक्षसच समजतात; कारण, ह्यासंबंधानें मेकॉलेच लिहितो--"We have ourselves heard old men talk of him ( Clive ) as an incarnate fiend," त्यालाच निरपराधी म्हणून पार्लमेंटनें सोडल्याचें आपण पाहातों; ज्या हेस्टिंगज्नें केवळ दर्पमदांत, आमच्या हिंदी राजेरजवाड्यांस संबोधून, "तुम्ही माझ्या पायाची केवळ धूळच आहांत " " You are but the dust of my feet, " असें म्हटलें, बंगाल लुटला, आणि स्त्रियांची अब्रू घेऊन त्यांच्या लज्जेच्या स्थळीं निष्ठुर खेळ खेळले असतांहि, तो अचानक सुटल्याचें आपण ऐकतों;ज्या हिंन्दी प्रजेनें आंग्लसरकारास, त्यांच्यावर युरोपांतल्या महायुद्धांतला बिकट आणि घोर प्रसंग आल्यावेळीं, कोटयावधि रुपयांची मदत, ती केवळ निर्धन असतांहि केली, व त्यांच्याच कार्यार्थ लढाईवर जाऊन, तिनें आपल्या आतेष्टादि लक्षावधि माणसांच्या रक्ताच्या नद्या वाहवून त्यांस रक्ताचे पूर आणिले, त्याच निरपराधी प्रजेच्या आप्त इष्टांवर, स्त्रीपुरुषांवर, मुलांबाळांवर, आणि स्तनपान करणाऱ्या अर्भ-

कांवर देखील निष्कारण गोळ्या घालून, सुमारें दोन हजार प्रजा, ज्या सेनापति डायरनें, केवळ गौरकायांच्या इभ्रतीसाठीं, मृत्युमुखीं दवडिली, व तिला जेथल्या तेथेंच थंडगार पाडली ( Horni. man's Amritsar पहा ); त्याबद्दल जेवढें लिहावें तेवढें थोडेंच ! किंबहुना, मेकालि, ड्यूगल्ड स्टूअर्ट, इत्यादींच्या अकटोपासून विकटोपर्यंतच्या संस्कृत ज्ञानाची आणि आशियस्थांविषयीं निर्मर्याद तिरस्कार बुद्धीची; क्लाईव्ह, हेस्टिंग्ज, सारख्यांच्या क्रूर हृदयाची, सैतानी वृत्तीची, व निःसीम लोभाची; डायरादि आंग्लांच्या कृतघ्नतेची; बॅल्फरादींच्या दर्पाची; आणि पोलादी पिंडाचें ( म्हणजे स्टील फ्रेमचें ) आंग्ल असल्याविषयीं लॉइड जॉर्जच्या गर्वोक्तीची, कितीही सुविस्तृत शोकार्हकथा लिहिली, तरी तीं अपुरीच होईल, यांत लेशमात्रहि शंका नाहीं.

## आमचें प्राक्कालीन पृथिवीपर्यटन.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, (मागील पान ९,१०,११पहा), स्वराज्याचा पाया घातल्यावर, अखिल जगत्तलावर स्वकीय उच्च संस्कृति प्रतिष्ठापित करण्याविषयीं तीव्र लालसा, आमच्या पूर्वजांत उत्पन्न झाली, व परवशतेंत न राहतां, आपलेंच प्रभुत्व सर्वत्र गाजवावें, असा हेतु मनांत धरून, त्यांनीं चारही दिशांस पर्यटन केलें; आणि तेथें ठिकठिकाणीं वसाहती वसवून, आपलें साम्राज्य स्थापिलें. ह्यासंबंधाचें प्रमाण ऋग्वेदांतच असल्यानें, तें मी येथें नमुद करतों.

**उप प्रेत कुशिकाश्चेतयध्वमश्वं राये प्रमुंचता सुदासः ।**

भावार्थ:—अहो कुशिकांनो ! पुढें व्हा, सावधान असा, व नृपति सूदासाचा घोडा यशःप्राप्त्यर्थ सोडा. कारण, पूर्व, पश्चिम, आणि उत्तर, यां दिशांकडील शत्रूंचा नाश हा राजा करीत आहे. सबब, हें काम झाल्यावर, तो स्वेच्छानुरूप इष्ट त्या ठिकाणीं, पृथिवीवर यज्ञ करील.

ह्यावरून, आमच्या ऋक्पूर्वजांनीं पूर्व, पश्चिम, व उत्तर, यां

तिन्ही दिशांकडे दिग्विजय केला, आणि स्वसाम्राज्य स्थापिलें, असें उघड दिसतें.

तदनन्तर, पूर्व, पश्चिम, व उत्तर, या दिशांप्रमाणेंच दक्षिणेकडील शत्रूंस देखील आमच्या वेदर्षींनीं चीत केल्याचें व्यक्त होतें. कारण, एका ऋचेत खालीं लिहिलेले उद्गार आढळतात.:—

**अपप्राच इन्द्रा विश्वा अमित्रा**
**नपापाचो अभिभूते नुदस्व ।**
**अपोदीचो अपशूरा धरा च**
**उरौ यथा तव शर्मन्मदेम॥**(ऋ.वे.१०.१३१.१).

शिवाय, सा नो विश्वा अतिद्विषः स्वसॄरन्या ऋतावरी । अतन्न हेव सूर्यः ॥ ( ऋ० वे० ६.६१.९ ), या ऋचेनें तर, सरस्वती नदीनें आमच्या सर्व दिशांकडील शत्रूंचा पराभव करून, आह्मांस यश दिल्याचें सिद्ध होतें.

तसेंच, आमच्या ऋक्कालीन ऋषींनीं आपलें साम्राज्य पृथिवीच्या पाठीवर सर्वत्र स्थापून, आपल्या विस्तीर्ण साम्राज्यावरील कोणत्याना कोणत्या तरी भागांत, हा तेजोराशि सूर्य अखंड चमकत असतो, आणि आपल्या प्रकाशानें तो ते सदैव पुनीत करतो, असेंहि ध्वनित केलें; व स्वमुखानें आपल्या कृतीची लेशमात्रहि वल्गना न करतां, केवळ मौनव्रतानें, आणि चक्षुर्वैसत्यम् । या न्यायानेंच, त्यांनीं तें जगाच्या निदर्शनास आणिलें. कारण, एक कवि म्हणतो, थोर लोक आपल्या कृतीची वल्गना स्वमुखानें केव्हांहि न करतां, मौनव्रत धरतात, व केवळ फलप्राप्तीनेंच त्याची सिद्धि दाखवितात.

**ब्रुवते हि फलेन साधवो न तु कण्ठेन निजोपयोगिताम् ।**

## उत्तरध्रुवाकडील आमच्या साम्राज्य-विस्ताराचा तपशील.

उत्तरध्रुव प्रदेशांत, आमच्या विस्तीर्ण वसाहती हजारों वर्षें चांगल्या भरभराटींत होत्या. सबब, तिकडील प्रान्तांत आढळून

येणारीं कित्येक दृक्प्रत्ययाचीं उदाहरणें, मी मासल्या करितां येथें देतों.

( अ ) ह्या उषा क्षितिजावर येऊन, किती तरी दिवस झाले? [ किया त्या उषसः यत् समया भवाति ? ऋ० वे० १.११३.१० ]. (आ) ह्या सूर्याला [ संध्याकाळीं बारा तासानन्तर अस्ताचली जाण्याचें ] कसलें ही बंधन नाहीं, हें देवांचें महदैश्वर्य होय. [ अबन्धनश्चरति वत्स एकः । महद्देवानामसुरत्वमेकम् ॥ ऋ० वे. ३. ५५. ६]. ( इ ) ऊर्म्यें अथा नः सुतरा भव। हे रात्रि उर्म्ये ! आम्ही तुझ्या पैलपार जाऊं, असें कर—ऋ० वे० १०. १२७. ६; इत्यादि, अनेक आहेत. त्यावरून, ह्या व अन्य कित्येक ऋचा, आमचे ऋक् पूर्वज तृतीय युगांत आणि हैमकालापूर्वी, उत्तर ध्रुवप्रदेशांत वसाहती करून राहिल्यावेळींच, रचल्या होत्या, असें उघड दिसतें.

## अमेरिकादि खंडांत आमच्या वसाहती.

आमच्या दिग्विजयाचीं प्रमाणें जशीं ऋग्वेदांत दृग्गोचर होतात, तशींच तीं रामायणांत व महाभारतांत सुद्धां सांपडतात. शिवाय, कोलमन, बॅरन हमबोल्ट, हार्डी, नामदार आलेकझांडर डेल मार, पोकॉक, इत्यादींच्या प्रमाणसिद्ध लेखांवरून, आम्हां भारतीय आर्यांच्या अमेरिकेंत देखील ठिकठिकाणी वसाहती होत्या, असें गणेश म्हणजे शुंडाकृति गणपति देव, आणि स्वस्तिकादि अवशिष्टें, ह्यांवरून सिद्ध होतें. ह्याबद्दलची सर्व प्रमाणें. मी " आर्यावर्तांतील जन्मभूमी व उत्तरधुवाकडील वसाहती " ( Aryavartic Home and Its Arctic Colonies) नामक इंग्रजी पुस्तकांत, चौदाव्या भागांत दिलीं आहेत. सबब, तिकडेच वाचकांनीं आपलें लक्ष पुरवावें, अशी माझी सूचना आहे.

त्याचप्रमाणें, यूरोप, आफ्रिका, व आशिया खंडांतसुद्धां,

व्यंजक होय, असें मॅक्समुलर देखील लिहितो (Max Muller's Science of Language. vol i. pp 275, 276. Fifth Ed 1866). पोकॉकच्या (India in Greece नामक) ग्रंथांत, इराण, बाबिलन, ईजिप्त, ग्रीस, इटली, स्कँडिनेव्हिया, स्कॉटलंड, इत्यादि देशांत, आमच्या वसाहती असल्याचें सिद्ध करण्यांत आलें आहे. आणि जाव्हा, सायाम, फिलिपाइन् बेटें, कांबोडिया, इत्यादि प्राचीतर देशांत व चीनसारख्या पूर्वाग्र देशांतसुद्धां, आमच्या वसाहती होत्या, हें आर्यावर्त-जन्मभूमी नामक माझ्या इंग्रजी ग्रंथावरून अनेक प्रमाणांसह दिसेल (भाग १४ वा पहा). चीन देशांत भारतीयांची टंकसाळहि असल्याचें टिरीन-डी-ला-कूपर (Terrien De La Couperie) नांवाच्या फ्रेंच प्रोफेसरनें सिद्ध केलें आहे (Hindu or Western Origin of the Early Chinese Civilization नांवाचा ग्रंथ पहावा).

ह्याखेरीज, या सेवकाचें भारतीय साम्राज्य, पुस्तक सहावें, भाग ३७वा, वाचकांच्या पहाण्यांत आल्यावर, विशेष तपशिलाची ज्यास्त हकीकत त्यांस तेथें उपलब्ध होईल. (नाना पावगी.)

## प्राचीन नामशेष राष्ट्रें, व भारतीय आर्यांचें आजपर्यंतचें अद्वितीय कर्तृत्व.

आतां, सत्याच्या जोरावर आमच्या भारतीय आर्यपूर्वजांनीं जे पराक्रम केले, ते ह्या जगत्तलावर, प्राचीन अथवा अर्वाचीन राष्ट्रांपैकीं, एकानें देखील केल्याचें दिसत नाहीं. सबब, त्याचा उल्लेख मी प्रथम करतों. पश्चिमेकडील राष्ट्रांत, पुराणतम म्हणून, ईजिप्त ऊर्फ मिसर देश अग्रेसर समजला जातो. परंतु, तो निमाला, आणि त्यानें एकदां संपादिलेलें अग्रेसरत्व साफ व कायमचें मावळलें. त्याचप्रमाणें, निनिव्ही व बाबिलन, आसीरिया आणि सीरिया, पालेस्टाईन व पार्शीया (इराण), ग्रीस आणि इटली,

गेल्यावर, त्यांपैकीं एकानें सुद्धां आपलें डोकें पुनश्च वर केलें नाहीं. अशा स्थितींत, **पौरस्त्यराष्ट्रांपैकीं** एकट्या **भारतवर्षानें**च ह्या जगत्तलावर तीन वेळां, भिन्न भिन्न काळीं, अनेक शतकें साम्राज्य केलें; आणि **भरतखंडांत** तर त्यानें तेरा वेळां स्वसाम्राज्याचा विजयध्वज फडकाविला. ही हकीकत मनोरंजक व ऐतिहासिक महत्वाची असल्यामुळेंच, **भारतीय आर्यां**विषयीं थोडें ज्यास्त विस्तारानें लिहिण्याचें मी साहस करतों. परंतु, तसें करण्यापूर्वी, मला एक गोष्ट वाचकांस अवश्य विदित केली पाहिजे. ती ही कीं, **पौरस्त्यराष्ट्रांत**, **चीन** आणि **भारतवर्ष**, अशीं दोन फारच पुरातन राष्ट्रें असून, **चीन** प्राचीनकाळीं फारच बलाढ्य होतें. परंतु, हल्लीं मात्र तें आपल्या प्राणांचें संरक्षण करूनच आहे. **भारतवर्ष** हें पृथिवीच्या पाठीवर सर्वांत पुराणतम व अत्युच्च अशा वैभवशिखरांप्रत पावलेलें राष्ट्र होय. तथापि,सांप्रतकाळीं, हें दु:सह पारतंत्र्य-कर्दमांत सांपडल्यामुळें, **पंके निमग्ने करिणि भेको भवति मूर्धगः ।** अशी त्याची संत्रस्तावस्था झाली

---

१ ( अ ) ह्यासंबंधानें, **एम् लुई. जेकालियट्** लिहितो कीं, " India is the world's cradle; thence, ... ... the common mother .. bequeathed us the legacy of her language, her laws, her *morale*, her literature, and her religion. " Preface. p vii.

(**आ**) And what hidden wealth to be unveiled. What treasures of literature, of history, of *Morale* and philosophy to be made known to the world ! " p 16.

( इ ) " Hindu emigration restored the light, (rendered service), to Egypt, Persia, Judea, Greece, and Rome, ... " p 19.

( ई ) " The Sanskrit is itself the most simple proof of the Indian origin of the races of Europe, and of India's maternity. " p 21. ( The Bible in India. Edition 1870 ).

आहे. पण, निराश व्हावयास नको. कारण, संतश्रेष्ठ तुकाराम म्हणतो:—

**भाग्या अभाग्याचीं आभाळें ॥ येतीं जातीं आपुलेंचि काळें॥**
**परंतु निश्चयाचें बळ ॥ टळों नये ॥**

शिवाय, नावेवर गाडा, आणि गाड्यावर नाव, ही क्रिया, कालगतीस अनुसरून, सदैव चालावयाचीच असून, रहाटगाडग्यांतील भरलेलें मडकें रिकामें होतें, व पुनश्च तें भरून वर येतें; ही या जगांतील रहाटी आहे. **नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण ।** म्हणून, सत्याची कास निरंतर धरून पुढें पाऊल टाकावें, म्हणजे यशाची किल्ली सांपडल्याखेरीज ख्चचितच राहणार नाहीं.

## सत्यावर दृढविश्वास हेंच आमच्या जयाचें कारण.

आमच्या पूर्वजांची निष्ठा सत्यावर फारच असे;आणि म्हणूनच ते त्याची कास कधीं देखील सोडीत नसत. ही त्यांची सत्यावरील निष्ठा, " सांगोसांगी, आणि वडाला वांगी, " अशी जी आपल्यांत म्हण आहे, तशा प्रकारची नसून, ह्यासंबंधाचें प्रमाण प्रत्यक्ष ऋग्वेदांतच सांपडतें. सबब, श्रोत्यांची खात्री होण्यासाठीं, तें मी येथें थोडक्यांत देतों.

(अ) **सत्यं ततान सूर्यः । ऋतं वित्तं मेऽस्य रोदसी ॥**
( ऋ० वे० १. १०५. १२ ).

(आ) **सत्येनोत्तभिता भूमिः । ऋतेनाऽऽदित्यास्तिष्ठन्ति॥**
( ऋ० वे० १०. ८५. १ ).

**भावार्थः**—(अ) आपल्या किरणासमवेंतच, सूर्यानें सत्याचा प्रसार केला. सत्य हेंच आमचें ऋत आणि वित्त. (आ) सत्य हेंच पृथ्वीचें आणि स्वर्गाचें अधिष्ठान आहे.

ह्या ऋचांपैकीं पहिलींतील " **ऋतं वित्तं मे** । " हे तीन शब्द, कालाच्या अनन्तत्वांत, अखंड संस्मरणीय आहेत, व त्याचा अर्थ " माझें धन केवल ऋतच होय, " असा होतो. अर्थात्, आम्ही **भारतीय आर्य** " सत्य, " किंबहुना ह्याच्याहि

पेक्षां सूक्ष्मतर, आणि " सरलता " हाच ज्याचा स्वभाव आहे, असें जें " ऋत ", तेंच आमचें " वित्त " आहे, तदितर नाहीं, असें मानतों. परंतु, ह्याहून विपरीत वृत्ति आंग्लादि राष्ट्रांची दिसते, व हीं राष्ट्रें कनक, कांता, आणि भूमि, यांना निःसीम आसक्त होऊन, सत्याला झुगारून देतात,व असत्याचाच यथेष्ट स्वीकार करतात. त्यामुळें, पुढें तीं फसतात, आणि केवळ **सत्याचें अधिष्ठान हेंच भारतवर्षाच्या** अप्रतीम व चिरकाल वैभवाचें कारण होय, ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत येत नाहीं, किंवा ती त्यांस खरीच वाटत नाहीं.

## भरतखंडावर हिंदूचें भिन्न भिन्न काळीं अद्वितीय शासनप्रभुत्व

ज्या भरतखंडांतील अगदीं निर्बल, निराधार, व सर्वांशीं निःशस्त्र केलेल्या प्रजेवर अवघें एकवेळच साम्राज्य करीत असतां, आंग्लांची फें फें होऊन, केवळ **का गतिः ।** च झालेली दिसते. (मागील पान १८, १९ पहा); आणि आम्हां राजनिष्ठ हिंदप्रजेची त्यांस भरपूर मदत, व पूर्ण सहानुभूति असून देखील, अशा प्रकारची त्रेधा सर्वत्र दृग्गोचर होते; व सामान्यतः, " धर, पकड, बिठाव कैदमें, " या महामंत्राखेरीज, अन्य सरळ मार्गाचा अवलंब करण्याला, या आंग्लांना धैर्य म्हणून केव्हां देखील झालेंच नाहीं, आणि तें होतहि नाहीं; किंबहुना, ' न्यायासनावर बसून न्याय द्या, चौकशी करा, व अपराध्यास जबर शिक्षा ठोठावा, ' अशी नम्रतापूर्वक दाद मागितली असतांहि, तिला लंडनांतील भारतमंत्री वाटाण्याच्या अक्षताच लावतात; त्याच सदैव सशस्त्र असलेल्या ( कारण, लंगडे, पांगळे, थोटे, निःशस्त्र, व्याधिग्रस्त, अथवा अन्य सबबींनीं अपंग झालेल्यांशीं सामना करण्याची आम्हां उदार भारतीयांच्या युद्धशास्त्रांत सक्त मनाई आहे, व तसा करणें आम्ही भागुबाईचें काम समजतों ( महाभारत. शांतिपर्व पहा ), त्याच वीर्यशाली भरतखंडावर, आम्हीं भारतीय आर्यांनीं, एक-

दोन वेळांच नव्हे पण, तेरा वेळां साम्राज्य, केवळ स्वकीय बाहु-बलानेंच केलें. एवढेंच नव्हे तर, भरतबाह्य शत्रु आमच्या ह्या पवित्रभूमींत भिन्न भिन्न काळीं घुसडलेले असल्यानें, त्यांस प्रथम हटवून, त्यांचा पराभव करून, आणि त्यांस वांकवून, हें साम्राज्य आम्हीं मोठ्या थाटानें, इभ्रतीनें, व उजळ माथ्यानें, अनेक शतकें केलें, आणि अनेक वेळां चालविलें. शिवाय, त्यापूर्वी, ह्या भूगोलावरील अनेक देश भिन्न भिन्न कालीं जिंकून, तेथें सुद्धां आमचें साम्राज्य प्रतिष्ठापिलें. सबब, एतद्विषयक अवश्य तो तपशील येथेंच अगोदर दिला पाहिजे.

### ऋक्-रामायण-भारत कालीन आमचें साम्राज्य.

ऋग्वेदकाळीं, आम्ही भारतीय आर्य अगदीं स्वतंत्र होतों, व त्यावेळीं, आम्हीं अखिल भरतखंडावर व जगत्तलावर साम्राज्य केलें. हा काळ तृतीय युगांतला व लाख-पन्नास हजार वर्षांपूर्वीचा असून ( मागील पान ६, ७, ८ पहा ), आमच्या ठिकठिकाणच्या वसाहतींचा तपशील मीं योग्य स्थळीं नमुद केला आहे ( मागील पान २२–२५ पहा ). ऋग्वेदानंतरचा हैमयुगकाल अथवा चतुर्थ-युग होय. ह्या कालांत, उत्तरध्रुवाकडील आमच्या वसाहतींची फार हानि झाली, आणि वसाहतवाल्यांस आर्यावर्तजन्मभूमीकडे परत येणें दुःसाध्य होऊन, हिमप्रलयामुळें त्यांना मार्गांतच बहुत काळ कंठावा लागला. तथापि, ह्या हिमप्रलयाची बाधा प्रत्यक्ष आर्यावर्तांत किंवा भारतवर्षांत, कोणांसहि अनुभवास आली नव्हती, एवढें ध्यानांत ठेवलें पाहिजे. ह्या कालांत, तसेंच रामायणकालांत म्हणजे इ. स. पूर्वी चार हजार वर्षें, व महा-भारतकालांत म्हणजे इ.स. पूर्वी तीन हजार वर्षें, आम्ही आपल्या जन्मभूमींत स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घेत होतों, आणि ह्या भरत-खंडाबाहेरील आमच्या ठिकाठिकाणच्या वसाहतींत सुद्धां आमचें साम्राज्य होतें.

सेमिरामिस् व डरायस् यांची हिंदुस्थावरील स्वारी काल्पनिक दिसते. कारण, तिला ऐतिहासिक आधारच उपलब्ध नसल्यानें, तत्संबंधाचा उल्लेख मीं येथें केला नाहीं.

## शिकंदरची स्वारी व तिची पीछेहाट.

पुढें, इ. स. पूर्व ३२६ सालीं, शिकंदरानें हिंदुस्थानावर स्वारी केली, आणि पंजाबांत शिरून, कांहीं मुलख आपल्या कब्जांत घेतला. परंतु, त्याचा कांहींएक उपयोग न होतां, शिकंदराची पाठ हिंदुस्थानाकडे वळतांच, आपणास जेता म्हणविणाऱ्या सेल्यूकसला, चन्द्रगुप्त मौर्यानें वठणीस आणिलें, त्याचा गर्व हरण केला, त्याच्याकडून १ आरिआना, २ काबूल, ३ हिरात, ४ कंदहार, ५ इराणच्या सरहद्दीवरील थेट पश्चिमेकडील गेड्रोशिया, इत्यादि प्रान्त आपल्या ताब्यांत घेतले, आणि शेवटीं तह घडून यावा, व सम्राट् चन्द्रगुप्ताशीं मैत्री व्हावी म्हणून, सिल्यूकसनें ह्याला आपली मुलगी देखील दिली.

सदरहु पांच प्रान्त, सिंधुनदीच्या पश्चिमेकडील आणि प्रत्यक्ष अफगाणिस्थानांतीलच असून, ते चन्द्रगुप्त मौर्यानें केवळ आपल्या बाहुबलावर व शौर्यादि साहसावरच मिळविलेले असल्यानें, ही गोष्ट इतिहासदृष्ट्या निःसंशय महत्वाची आणि अतएव नमुद करण्यासारखी आहे. कारण, त्यावरून, तेथपर्यंत, ह्या सम्राट् राजाच्या बृहद्विस्ताराची पश्चिमेकडील सरहद्द झाली, हें विसरतां कामा नये. ह्याच सरहद्दीसाठीं, जय्यत शस्त्रास्त्रवाल्या आंग्लांनीं लाळ घोटली, दुःखाश्रू ढाळले, व जिवापाड मेहेनत केली. परंतु, त्यांना ती शेवटपर्यंत मिळाली नाहीं, आणि मोगल राजांस देखील त्या कामांत यश आलें नाहीं. पण, तीच आमच्या रणधीर भारतीय आर्य कुलावतंसानें, हं हं म्हणता साध्य करून, अखिल जगास शिताफीनें आपलें कर्तृत्व दाखविलें, व पाश्चात्यांस दिपवून टाकून तोंडांत बोटेंच घालावयास लाविलें. ह्यासंबंधानें, व्हिन्सेंट स्मिथ

लिहितो:–" The first Indian Emperor, more than two thousand years ago, thus entered into possession of that 'scientific frontier, sighed for invain by his English successors,' and never held in its entirety even by the Moghal monarchs of the sixteenth and seventeenth centuries." ( vide The Early History of India. By Vincent Smith. Second Edition. p 118 ).

## मौर्यादि भारतीय सम्राट् राजे.

वर नमुद केलेला तह इ.स. पूर्व ३०३ सालीं घडून आला, व त्यापूर्वी चन्द्रगुप्त मौर्य इ. स. पूर्व ३२५ सालीं सम्राट् राजा झाला. पुढें, त्याच्या पुत्र-पौत्रादींचें साम्राज्य इ. स. पूर्व १८४ पर्यंत टिकलें.

तदनन्तर, शुंग, काण्व, आंध्रादींचें साम्राज्य सुरूं झालें, व तें इ. स. २३६ पर्यंत राहिलें. ह्यानन्तर, इ. स. ३२० पर्यंत, आमचे कोणकोणते भारतीय आर्यवंशज सिंहासनारूढ होते, हें निश्चयात्मक कळत नसल्यानें, त्यांचा तपशील मीं दिला नाहीं. आंध्रांचें साम्राज्य होण्यापूर्वी, ते कांहीं वर्षें मौर्य सम्राटांचे मांडलिक होते. तथापि, त्यांचें राज्य एकंदर ४५६ वर्षें टिकलें, असें वायु व मत्स्यपुराण, आणि पाश्चात्य इतिहाससंशोधक, यांच्या लेखांवरून कळतें. यासंबंधानें, व्हिन्सेंट स्मिथ लिहितो कीं,

" The testimony of the Puranas ( Vayu and Matsya ) that the dynasty endured for 456½ years, or in round numbers, four centuries and a half, appears to be accurate." ( vide The Early History of India. By Vincent A. Smith. Second Edition. 1908. p 202 ).

गुप्तसाम्राज्य इ. स. ३२० पासून ६०६ पर्यंत होतें, व पश्चात् हर्षसाम्राज्य सुरूं होऊन, तें इ. स. ६४८ पर्यंत टिकलें. त्यानंतर, काश्मीर, कनोज, बंगाल, माळवा, इत्यादि प्रान्तांत लहान मोठे भारतीय आर्यवंशांतले राजे झाले, आणि त्यांनीं आपला सुकीर्ति परिमल उत्तर हिंदुस्थानांत इतस्ततः सोडला.

पुढें, मुसलमानांच्या स्वाऱ्या अकराव्या शतकापासून उत्तर हिंदुस्थानांत येत चालल्या. त्यामुळें, इ.स. सतराव्या शतकाच्या अव्वलीस, तरवार बहाद्दर मराठे क्षितिजावर येईपर्यंत, त्यांस हटवून, त्यांची रग जिरविणारा कोणीच उदयास आला नाहीं. तथापि, त्या मुदतींत, महाराष्ट्रांत व दक्षिणेस मोठमोठीं साम्राज्यें झालीं, आणि त्यांत हिंदू सम्राट् राजांनींच अनेक वेळा आपलें शौर्य गाजविलें. सबब, त्यांची हकीकत मी थोडक्यांत देतों.

| | |
|---|---|
| **चालुक्य साम्राज्य (वातापि अथवा बदामी)** | इ. स. ५५०–७५३ |
| **राष्ट्रकूट साम्राज्य ( मालखेड ).** | इ. स. ७५३–९७३ |
| **चालुक्य साम्राज्य ( कल्याण ).** | इ. स. ९७३–११९० |
| **चौल साम्राज्य.** | इ. स. ८४६–१३१८ |
| **विजयानगर साम्राज्य.** | इ. स. १३३६–१५६५ |
| **केरल अथवा मलवार साम्राज्य.** | इ. स. ८२५–१७९२ |
| **मराठा साम्राज्य.** | इ. स. १६२७–१८१८ |

अशाप्रकारें, वरील कालांत आमच्या हिंदुस्थानांतील अनेक सम्राट्राजांनीं आपापल्या कारकीर्दींत जी कामगिरी बजाविली, ती त्यांच्या ब्रीदाला व त्यांच्या भाग्यशाली देशाला निःसंशय शोभण्यासारखीच आहे. परंतु,पुढें ह्या दिव्य भारतखंडाला ओहोटी लागून, फार वाईट दिवस आले; आणि त्यावेळीं, उत्तर हिंदुस्थानांत व दक्षिण हिंदुस्थानांत इस्लामशाहीनें कायमचा तळ दिल्यानें, हिंदूंच्या प्रतापसूर्यांस जणुंकाय ग्रहण लागल्यासारखेंच झालें. त्यामुळें, सर्व हिंदू केवळ तेजोहीन, बलहीन, आणि पराक्रमहीनच असल्याविषयीं, सर्वांच्या मनावर विपरीत संस्कार होऊन, त्यांच्या यशस्वी नांवाला निव्वळ कलंकच लागला. पण, तो साफ धुऊन काढून, दिग्विजयी मराठ्यांनींच जेव्हां हिंदूप्रतापसूर्यावर आलेलें अभ्रपटल दूर केलें, व हिंदूंचें मूलतेज सर्वांस दाखविलें, तेव्हां मात्र आमचा दरारा आणखी एकवार सर्वत्र बसला, आणि निर्बल राष्ट्रें आमच्या प्रबल बाहूंची पुनश्च वारंवार आठवण करूं लागलीं. सबब, एतद्विषयक मी किंचित् दिग्दर्शन करतों.

आम्हां मराठ्याचें नांव निघाल्याबरोबर, मोगलांची, इस्लामची, गौरकायांची, व इंग्रजांची देखील कशी गाळण होई, आणि ते आम्हांला कसे थरथरां कांपत, याचा दाखला मी पूर्वींच दिला आहे. किंबहुना, मेकॉले सारख्या ज्या आंग्लांना, आम्हां हिंदूविषयीं, व त्यांतहि विशेषत: मराठ्यांविषयीं, लेशमात्र सुद्धां प्रेम नाहीं, त्यांनीं सुद्धां ती गोष्ट निर्विवाद कबूल केली आहे (मागील पान १७, १८ पहा). यासाठीं, तत्संबंधी पुनरुक्ति न करतां, सामान्य लोकांत देखील मराठ्यांच्या नांवाचा किती दरारा असे; तें नांव त्यांना कसें भयप्रद वाटे; त्याबद्दलचे अनेकविध संस्कार आमची रयत, आमचे नोकरचाकर, आमचे शिपाईप्यादे, आणि आमचें बाजारबुणगें, यांच्यावर कशा प्रकारचे झाले होते; इत्यादि सांगण्याची खचित्‌च आवश्यकता असल्यानें, त्यांची हकीगत मी येथें थोडक्यांत देतों.

आम्हां मराठ्यांचा भगवाझेंडा दक्षिणेकडील तंजीतंजावरपासून तों थेट उत्तरेकडील अटकेपर्यंत फडकत होता. शिवाय, पूर्व पाश्चिम समुद्रांनीं वलयांकित असलेला प्रदेश सुद्धां आमच्याच ताब्यांत असल्यानें ( Shivaji's " new possessions were securely bound together from sea to sea." ... ... ... See Kincaid's History of the Maratha People. vol I. p 260 ), आमचे घोडेस्वार व रिसाला इतस्तत: प्रसंगानुसार सर्वत्र संचार करी. त्यावेळीं, तृषार्त घोडे, पाणी पिण्यासाठीं, वाटेवरील नदीनाल्यांत जात, व पाणी पीत. पण, कर्मधर्मसंयोगानें, जर एकादा घोडा, त्याला तहान लागली नसल्यानें, पाणी प्याला नाहीं, तर अश्वरक्षणार्थ ठेवलेले मोतद्दार आणि अन्यबारगीर, त्या घोड्याला अनुलक्षून असें लागलींच म्हणत कीं, "**क्यंव बे घोडा ! कायकुं डरता है ? पानीमें कछु मराठेकुं देखता है ?**

---

१ ही हिंदुस्थानी म्हण कदाचित् कोणांस समजणार नाहीं; व ह्या अज्ञानामुळें, तिचें खरें रहस्य त्यांच्या लक्षांत येणार नाहीं. सबब, तिचें सार मी मराठींत येथें देतों. " बा घोड्या ! तूं कां रे दचकतोस ?

अशा प्रकारची जबरदस्त वचक व प्रखर शासनतेज, एकाकाळीं मराठ्यांचें होतें; आणि म्हणूनच, त्यांचा सर्वत्र बोलबाला राही. किंबहुना, त्यांच्या अतुल पराक्रमामुळेंच, प्रबल व दुर्बल राष्ट्रांचें चित्त त्यांच्याकडे वेधलें जाऊन, ते आपापल्यापरी मराठ्यांची मदत सदैव मागत. ह्यांपैकीं, केवळ स्थलसंकोच मनांत आणून, मी फक्त एकच प्रसंग येथें नमुद करतों. इ.स. १७३२ सालीं, महंमदखान बंगश नांवाच्या एका अफगाण रोहिल्यानें, बुंदेलखंडावर निष्कारण व अन्यायानें स्वारी केली, तेथील छत्रसाल नामक राजाचे किल्ले घेतले, आणि त्याच्या राजधानींत शिरून त्याला तेथून हांकलून लाविलें. अशा प्रसंगांत, छत्रसालराजाला कोणाचाहि पाठिंबा किंवा आश्रय नव्हता. परंतु, त्याला एक गोष्ट माहीत होती. ती ही कीं, बलाढ्य ब्राह्मणांस शरण गेल्यावर, ते केव्हांहि मरण देतच नाहींत. शिवाय, ब्राह्मण हे सत्याचें रक्षण करणारे असून, ते कोणासहि भीत नाहींत, व अपराध्यास सोडीत नाहींत; अशा मजकुराचा खालील दोहोरा त्याच्या कानावरून गेला होता.

**बम्मन का बच्चा । सदा सच्चा ॥**
**किसिकूं नहि डरता । किसिकूं नहि छोडता ॥**

---

तूं पाणी कां पीत नाहींस ? त्यांत तुला कोणी **मराठा** दिसतो काय ? आणि म्हणूनच तुला त्याची भीती वाटल्यानें,तूं पाणी न पितां, थांबलास काय ?”

१ (**अ**) ब्राह्मणांचें सत्यप्रेम, किंबहुना, अखिल भारतीय आर्यांची, ही सत्यप्रीति अनादिकालापासूनची दिसते. ( मागील पान २७ पहा ).

(**आ**) अखिल विदेशी राष्ट्रें ( इतालियन्, ग्रीक, इराणी, इस्लामी, क्रिस्ती, चिनी, इत्यादि सर्व ) भारतीय आर्यांच्या सत्यप्रियतेचीच साक्ष देतात, व इ. स. पूर्व ४०५ पासून चालू शतकापर्यंत ते तिचें वर्णन करतात. ह्यांपैकीं, मी कांहीं उदाहरणें येथें देतों.

ही वस्तुस्थिति छत्रसालराजाच्या मनांत येतांच, त्यानें श्रीमंत बाजीरावास एक पत्र लिहून, त्यांत, घडून आलेली सर्व हकीकत त्यानें निवेदन केली; आणि " आतां बुंदेलखंडची व माझी आब्रू जाण्याचा प्रसंग ठेपला आहे; सबब, यावेळीं तुम्हीं धांवून यावें, आणि परचक्रापासून जें महत्संकट उद्भवलें आहे, त्यांतून मला मुक्त करावें;असें एका दोहोऱ्यांत लिहून सुचविलें. हा दोहोरा ऐतिहासिक महत्वाचा असल्यानें, तो मी येथें नमुद करतों.

**जो गत ग्राह गजेंद्रकी । सो गत भै हे आज ॥**
**बाजी जात बुंदेलकी । राखो बाजी लाज ॥**

पेशव्यांच्या बखरींत हाच मजकूर मराठींत आहे, तो असा कीं,—

**तीच गति झाली गजेंद्राची । तीच आज आमची साची ॥**
**बाजी जाते बुंदेलाची । राखी बाजी राया ॥**

वरील आशयाचें पत्र बाजीरावाच्या हातीं पडतांच, त्यानें लागलींच छत्रसालराजास आश्रय देण्याचें ठरवून, तो बुंदेलखंड-च्या माहितगार वाटाड्यांबरोबर निघाला, व सर्व वाट, दाट जंग-लांतूनच असल्यानें, कूच दरकूच करीत करीत, त्यानें रोहिला बंग-

---

( इ ) इ. स. च्या तेराव्या शतकांत ( १२९४–९५ सालीं ), मार्को पोलो नांवाचा व्हिनीशियन फिरस्ता म्हणतो, " ब्राह्मण हे उत्तम व फारच सच्चे व्यापारी आहेत, तें कांहीं झालें तरी खोटें बोलतच नाहींत. ( मॅक्स मुलर. भारतवर्ष. पान ५६ पहा ).

( ई ) हिंदूचें हें सत्यप्रेम विदेशीयांच्या आणि खुद्द इंग्रजां-च्याहि अनुभवास गेल्या एकोणीसाव्या शतकांत आल्याचें व्यक्त होतें. " Their ( Hindus') commercial integrity has always been famous. " ( Report of English Select Committee. 1853. Question. 2278 ). " Commercial honour stands higher in India than in any other country. " p 63 ). ( मॅक्समुलर भारतवर्ष. पान ६३ ).

ह्यावरून, हिंदूंत, हल्लींचें असत्याचें प्राबल्य केवळ दुःसंगतीनेंच वाढल्याचें उघड होतें. ( Vide Max Muller's India. What Can It Teach Us ? pp 35-75. Ed 1883 ).

झाला अचानक गांठलें. परंतु, तो पळून गेल्यामुळें जरी हातीं लागला नाहीं, तरी त्यानें तेथें रोंवलेलें बूड, बाजीरावानें साफ खणून काढून, उपटून टाकलें, आणि छत्रसालराजाला संकटांतून पार पाडलें.

ह्या उपकाराची फेड छत्रसालराजानें कृतज्ञतापूर्वकच केली. त्यानें बाजीरावास सन्मानपूर्वक बोलाविलें, आणि सांगितलें कीं, " माझ्या दोन पुत्रांप्रमाणें, तुम्ही माझे तिसरे पुत्र आहांत, असें मी समजतों. सबब, माझ्या बुंदेलखंडच्या राज्यापैकीं, ४२ लक्षांचा मुलुख माझा वडील मुलगा हिरदेश यास, ३६ लक्षांचा मुलुख, माझा धाकटा मुलगा जगत्‌राज यास, व ३३ लक्षांचा मुलुख ' तुम्ही बाजीराव ' पेशवे यांस, तोडून दिला आहे. तरी, त्याचा तुम्हीं वंशपरंपरेनें उपभोग घ्यावा. "

येथें, एवढें मात्र अवश्य ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, बाजीरावानें आपली कामगिरी आर्तनिमंत्रणानुरूप यथेष्ट बजाविल्यावर, तो त्याबद्दलचा कांहीं एक मोबदला न मागतां, माळव्याकडे लागलींच परत जावयास निघाला. त्यावेळीं, छत्रसाल राजानेंच त्यास कांहीं दिवस मुद्दाम राहून घेतलें, आणि वर नमुद केल्याप्रमाणें, कृतोपकाराची फेड केली.

## हें चित्र पहा, व तें चित्र पहा.

ह्या प्रसंगीं, छत्रसाल राजाच्या विलक्षण दानशौर्यानें, आम्हांला सहजींच जालियनवाला बागेंतील उलट मोबदल्याचें व आंग्लांच्या राक्षसी कृतघ्नतेचें स्मरण झाल्यानें, आमचा जीव विव्हल होतो; आणि आंग्लकार्यार्थ, भारतीय आर्यांच्या कोट्यवधि रुपयांचा चुराडा व लक्षावधि प्राणांची आहुती होऊन देखील, शेवटीं त्यांची फेड म्हणून, आमचें निरपराधी दोन हजार पुरुषबायका, मुलेंबाळें, आणि स्तनपान करणारीं मातृस्तनींच असलेलीं अर्भकें, हीं सर्व आंग्ल सेनापती डायरच्या अग्न्यस्त्राला, व केवळ त्याच्या लहरीला बळी पडतात !! (मागील पान २१, २२,

पहा ), या सारखें भारतमातेच्या शरीराला आणि मनाला निरंतर व अखंड वेदना करणारें दुसरें दुःखच नाहीं, असें वाटूं लागतें ! किंबहुना, " हें आंग्ल चित्र पहा, आणि तें भारतीय चित्र पहा," इतकेंच आपणांसारख्या गुणग्राहक श्रोतृसमूहास व वाचकवर्गास सुचविण्यापलीकडे, ह्या तीव्र दुःखानें भडकलेला अग्नि शीतल होण्याला दुसरा मार्गच नाहीं, असें मनांत येऊन, स्वस्थ बसणें भाग पडतें. अर्थात्, हा केवळ कालमहिमाच होय !

आतां, अद्वितीय जयप्राप्तींत सुद्धां, मराठे कसे स्थितप्रज्ञ असतात, आणि अनुकूल स्थितींत देखील त्यांचें सौजन्य कसें ढळत नाहीं, याची आणखीं कांहीं उदाहरणें देणें अगत्याचें असल्यामुळें, तीं मी येथें नमुद करतों. श्री शिवाजी महाराजाला एकसारखी जयप्राप्ति झाली असतांहि, तो केव्हांच हल्लींच्या राज्यांतील कामगारांप्रमाणें उन्मत्त झाला नव्हता, किंवा दर्पानें मस्त होऊन, आपलें शील व सौजन्यहि त्यानें कधीं सोडलें नव्हतें. ह्या गोष्टीची साक्ष आंग्ल अधिकारी आणि तज्ज्ञ इतिहासकार सुद्धां देतात व लिहितात, ' In all history, there is no such example of modesty in the face of continued success " of Shivaji. ( Kincaid's History of the Maratha People. Vol i p 276 ). ह्याच मासल्याचें आणखी एक उदाहरण चिमणाजी आप्पा पेशव्यांचें होय. इ. स. १८३९ सालीं, त्यानें वसईचा किल्ला सर केल्यावर, त्या किल्ल्याच्या पोर्तुगीज गव्हरनरची रूपवती स्त्री मराठ्यांच्या फौजेची दृष्टि चुकवून पळून जात होती. परंतु, तिला त्यांनीं लागलींच टेहळली, आणि त्यांचे धनी, सेनापति चिमणाची आप्पासाहेब पेशवे, यांच्या सान्निध तिला आणिली. तेव्हां, त्यांनीं चौकशी केली; व ती स्त्री आहे असें कळतांच, तिच्या संबंधानें स्थितप्रज्ञाचें धैर्य आणि शीलवान् पुरुषाचें सौजन्यच त्यानीं दाखविलें; तिला तिच्या इतमामाप्रमाणें उंची लुगडें, चोळी, इत्यादि सौभाग्य द्रव्यें हिंदुरिवाजाप्रमाणें दिलीं; व तिची सर्वप्रकारें आब्रू राखून, तिच्याकडे स्वतः नुसती दृष्टिहि न फेंकतां, तिला तिच्या पतीकडे मोठ्या बंदोबस्तानें पोहोंचती केली. अर्थात्, ह्याच

कारणांसाठीं, किंकेड लिहितो कीं, जयप्राप्तीनंतरहि, मराठे हे मनाची उदारवृत्ति ठेवतात, आणि ती प्रशंसनीयच असते. " In the hour of victory, the Marathas showed commendable generosity. " ( vol ii. p 253).आणि म्हणूनच मी आपणां श्रोतृवृंदांस पुनश्च विनंति करतों कीं, " हें भारतीय आर्यांचें चित्र पहा, व तेंच ( पान २१, २२,३६,३७, वरील ) आंग्लांचें चित्र पहा. "

## सिंहावलोकन.

कांहीं नामांकित अपवादखेरीज करून, बहुतेक आंग्लांची वृत्ति, पूर्णदर्पमदात्मक व आत्मश्लाघायुक्त असल्यानें, "माझेंच घोडें जाऊं द्या पुढें, " असें ते सदैव अरेरावीनें म्हणतात,आणि तसें करणें केवळ त्यांच्या अंगवळणींच पडलेलें असतें. (मागील पान २०, १८ पहा ). कारण, ते अगदीं निःशंकपणें असें लिहितात कीं, " राज्यकारभारांत प्रजेला हक्क असणारा, व प्रजेच्या इच्छेप्रमाणें चालणारा समाज म्हटला म्हणजे कायतो यूरोपियनांचाच होय " (विश्वकोश. पान १०). ह्यानन्तर, ते म्हणतात, "दुसरी गोष्ट विशेषेंकरून ध्यानांत ठेवली पाहिजे. ती ही कीं,फिजी-बेटांतील प्रजेप्रमाणें हिंदुस्थानांतील प्रजा देखील स्वराज्यास पात्र नाहीं. तेव्हां, हाच कायतो युरोपीय आणि हिंदी समाजांतील महत्वाचा भेद होय. " ( पान २० पहा ). ' They ( Europeans ) were the only communities in which the governed visibly took some share in the work of government. " (p 10). " One leading distinction may be drawn, namely between the communities which are allowed to govern themselves, and those which ... being unfit for self-government, like Indians and Fiji, ... are governed by the officers of the English Government ( Ency. Bri Vol xi. p 20. Edition Ninth ).

हे वरील अवतरणांतील लेख, लेखकानें लिहिल्यावेळीं, त्याची दृष्टि इंग्लंडच्या इतिहासाकडे गेलेली दिसत नाहीं. कारण,

त्यावरून, रयतेला राज्य कारभारांत भाग देणें बाजूलाच राहून, उलट इंग्लंडच्या राजांनीं शेंकडों वर्षें अनियंत्रितपणेंच राज्य चालविलें आणि सर्व सत्ता आपल्याच हातांत ठेवली, असें खालील अवतरणावरून, वाचकांच्या लक्षांत येईल. एक **आंग्ल** इतिहासकार लिहितो, " One thing more, we must not forget to notice. For hundreds of years, our monarchs ruled just as they pleased, and kept most of the power in their own hands." (The Empire History p 15- Ed 1891). अशा प्रकारें, राज्यकारभारांतील प्रजेचे हक्क धाब्यावर बसवून सुद्धां, आपलेच गोडवे पुनश्च गाण्याला **आंग्लांचा** हातखंडा !!!

एवंच, चढेल **आंग्ल** आपल्या व आमच्या देशाची चांगली माहिती मिळविल्याशिवाय, हवें तें लिहितात, याबद्दल कोणासहि खेद उत्पन्न झाल्यावांचून खचित राहणार नाहीं. म्हणून, **भार**तवर्षाचा स्वराज्यविषयक यथार्थ वृत्तान्त उपलब्ध व्हावा या हेतूनें, खालील गोष्टींकडे अवश्य लक्ष सर्वांनीं, व त्यांतहि विशेषत: **आंग्लांनीं** पुरविलें पाहिजे. कारण, **हिंदूं**विषयीं त्यांचें मन प्रथमपासूनच कलुषित झालेलें दिसतें. सबब, ह्या गोष्टींकडे त्यांनीं अवश्य लक्ष पुरविल्यानें, त्यांचें हित होईल.

( अ ) मागील पृष्ठांक ८ वर, **"आम्हीं दिलेले स्वराज्याचे धडे,"** आणि तत्संबंधी केलेलें तदनंतरचें दिग्दर्शन.

( **आ** ) मागील पृष्ठांक ६,७ वर, दर्शविलेला त्यांचा **काल.**

( इ ) **आर्यांच्या** ग्रामसंस्थांचें **निरीक्षण.** हें झाल्यानें, **आंग्लांच्या** पोकळ गर्वोक्तीचें निरसन हं हं म्हणतां होईल.

( ई ) आम्हां **भारतीय आर्यां**पासून **आंग्ल** जे धडे शिकले, त्यांमुळें त्यांस झालेली यश:प्राप्ति.

ह्या यश:प्राप्तीचें सप्रमाण दिग्दर्शन, मी येथें थोडक्यांत करतों. **कै. न्या. मू. रा**नडे लिहितात कीं, " राज्यशकट चालविण्याच्या बाबतींत, **शिवाजीनें** जीं तत्वें स्वीकृत केलीं होतीं, त्यांचाच अंगीकार इंग्रजांनीं केला. " " That ( British ) authority, when it obtained supremacy, gave its deliberate preference to the principles ( of government ) laid

down by Shivaji "...( Rise of the Maratha Power. p 146. Ed 1900 ).

शिवाय, ह्यांमुळेंच आंग्लांस यशःप्राप्ति झाली, असें नामदार किंकेड देखील म्हणतो. " He ( Shivaji ) yet found time to think out a system of administration which, as Mr. Ranade has pointed out is the basis of British success. " (Kincaid's H. M. People. vol i. p 273).

तात्पर्य, इतर राष्ट्रांच्या मानानें, हिंदूंचें सौजन्य, त्यांची नीति, त्यांचा संभावितपणा,त्यांची सत्यप्रियता, त्यांचें पापभीरुत्व, इत्यादि गुण निःसंशय बहुमोल आहेत. अशी वस्तुस्थिति असून देखील, मेकॉले व अन्य आंग्ल, कांहीं नामांकित अपवादखेरीज करून, मराठ्यांस लुटारू, दरवडेखोर, ( plunderers, free-booters, public robbers, brigands,) इत्यादि विशेषणें लावून, त्यांची संभावना करितात. परंतु, ह्याच आंग्लांच्या पूर्वजांची कृति, (मागील पान १४, १५ पहा), आणि क्लाईव्ह, हेस्टिंग्ज, इत्यांदींचें वर्तन (मागील पान १६, २१, पहा), यांची कडी मराठ्यांच्यावर असतांहि, त्यांच्या दुष्कृतींचें स्मरण, मेकॉले व अन्य आंग्ल यांस होत नाहीं; आणि तें लाजेकाजेस्तव झालेंच तर, तिच्या-संबंधानें, ते सारवा सारव करतात, व तिच्यावर अजिबात सारवणच देतात, हें आश्चर्य होय !

## उषःकाल व सुर्योदय.

असो. आम्हांस तूर्त ओहोटी लागली आहे. पण, ओहोटी-नंतर, निःसंशय भरतीचीच पाळी येणार. सूर्य अस्तास जातो खरा. परंतु, तो निश्चयेंकरून उदयाचलीं येण्याकरतां, आणि उषःकालप्राप्त्यर्थंच होय. चेंडू जितक्या जोरानें खालीं आपटला जातो, तितक्याच तीव्र वेगानें, तो पुनश्च वर येतो, हा क्रियाप्रतिक्रियेचा एक अनुल्लंघनीय नियमच आहे.

॥ पतितः पतितः पुनरुत्पतति ॥

॥ श्रीसद्गुरुः प्रसन्नोस्तु ॥

# नाना* पावगीकृत ग्रंथमाला.

( मराठी भाषेंतील )

## १ ऐतिहासिक ग्रंथ.

## भारतीय साम्राज्य.

एकंदर पुस्तकें बावीस. पैकीं, पहिलीं अकरा सांप्रत छापून तयार आहेत, व दुसरीं राहिलेलीं अकरा छापत आहेत.

| | | किंमत रु. आ. पै. |
|---|---|---|
| १. | आर्यदेश व तत्संबंधीं वृत्तांत. ... ... | १–०–० |
| २. | आर्यलोक व त्यांचें बुद्धिवैभव. ... ... | १–०–० |
| ३. | आर्येतिहास व भूगोल. ... ... ... | १–०–० |
| ४. | आर्यशास्त्र व कला. ... ... ... | १–०–० |
| ५. | आर्यशासनपद्धति व नानाविध संस्था. ... | १–०–० |
| ६. | आर्यगृहस्थिति, नीति, शौर्य व उन्नति. ... | १–०–० |
| ७. | भरतखंडांतील मुख्य धर्म. ... ... ... | १–८–० |
| ८. | भरतखंडांतील जातिवैचित्र्य. ... ... | १–८–० |
| ९. | भरतखंडांतील नानाविध भाषा. ... ... | १–८–० |
| १०. | संस्कृत भाषेचा इतिहास. ... ... | २–८–० |
| ११. | प्राकृत व मराठी भाषेचा इतिहास ... ... | २–८–० |

## २ शास्त्रविषयक ग्रंथ.

| | | |
|---|---|---|
| १. | भाषाशास्त्र. ... ... ... ... | २–८–० |
| २. | भारतीय नाटकशास्त्र व नाट्यकला, आणि पौरस्त्य व पाश्चात्य रंगभूमि. ... | २–८–० |

* जन्ममिति फाल्गुन शु॥ ९ शके १७७६. भानुवासेर.

## ३ काव्य.

१. मनोरंजनशतक. ... ... ... ... ०-२-०

## ४ अन्वेषणात्मक ग्रंथ.

१. आर्यावर्तांतील आर्यांची जन्मभूमि
व उत्तरध्रुवाकडील त्यांच्या वसाहती. ... ३-०-०
२. सोमरस-सुरा नव्हे. ... ... ... ०-८-०
३. वेदकालीन भूस्तरशास्त्र अथवा भूस्तरशास्त्राचे
वेदर्षी जनक. ... ... ... ... २-०-०

## ५ आत्मवृत्त. १-१२-०

(इंग्रजी भाषेंतील)

## SCIENTIFIC AND RESEARCH WORKS.

R. A. P.

1. The Vedic Fathers of Geology. 1-8-0
2. The Aryavartic Home and its Arctic Colonies. ... ... 3-8-0
3. Self Government in India, Vedic and Post-Vedic. ... 3-8-0
4. The Indigenous Soma and the Aryan Autochthones in India. ... ... ... 0-8-0
5. Soma Juice is not Liquor ... 0-8-0

हे सर्व ग्रंथ ग्रंथकर्त्याकडे मिळतील.

मिळण्याचें ठिकाण—सदाशिव पेठ,
९८२ पुणें शहर.